cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१८० | मंगळवार, दि.२८ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### महायुतीत अविश्वासाचे वारे!

महायुती एकत्र लढणार की स्वबळावर याबाबत अजून स्पष्टता झालेली नाही. मात्र, महायुतीत अंतर्गत धुसफूस सुरू असल्याचे दिसून येत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अचानक दिल्ली वारी केल्याने त्यासंबंधीच्या चर्चेला उधाण आले आहे. आज अचानक गाठ पडे.. असा काही प्रकार दिसत नाही, पण त्यामागे काही तरी गौडबंगाल असावे असे बोलले जात आहे.

# कापसातील ओलाव्याची अट २० टक्क्यांपर्यंत करा!

## शेतकऱ्यांची मागणी, ओलावा जास्त असल्याने कमी भावात कापूस विकण्याची वेळ

पुणे । प्रतिनिधी

**१२ टक्क्यांच्या आत ओलावा असलेला कापूस शेतकऱ्यांकडे उपलब्ध नाही. परिणामी शेतकऱ्यांना इच्छा नसतानाही खुल्या बाजारात कमी भावात कापूस विकावा लागत आहे. त्यामुळे सीसीआयने कापूस ओलाव्याची अट शिथिल करून २० टक्क्यांपर्यंत करावी, अशी मागणी सर्वच कापूस उत्पादक राज्यांनी केली.**



बाजारात सध्या कापसाचा भाव हमीभावापेक्षा किमान १३०० ते १५०० रुपयाने कमी आहे. कापसाचा हमीभाव लांब धाग्याच्या कापसासाठी ८ हजार ११० रुपये आहे. तर मध्यम लांब धाग्याच्या कापसासाठी ७ हजार ७१० रुपये हमीभाव आहे. मात्र खुल्या बाजारात कापसाला ६ हजार ५०० ते ७ हजार रुपये भाव आहे. कापसाची वेचनी होत आहे तसे बाजारात कापसाची आवकही वाढत आहे. सीसीआयने सर्व कापूस उत्पादक राज्यांमध्ये हमीभाव खरेदी केंद्रे सुरु केली. देशभरात ५५० केंद्रे सुरु करण्याचे उद्दीष्ट होते. त्यापैकी महाराष्ट्रात १५० केंद्रे सुरु होत आहेत. महाराष्ट्र आणि गुजरातमध्ये १५ ऑक्टोबरपासून केंद्रे सुरु व्हायला सुरुवात झाली. तर तेलंगणा, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशात २१ ऑक्टोबरपासून खरेदी सुरु झाली. खरेदी केंद्रे सुरु झाली मात्र ओलावा अधिक असल्याने खरेदी कमी होत आहे. पेरणीसाठी शेतकऱ्यांना पैशांची गरज आहे. मात्र, कापसात ओलावा अधिक ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### न्यायमूर्ती सूर्यकांत होणार देशाचे सरन्यायाधीश

नवी दिल्लीः सरन्यायाधीश बी.आर. गवई यांनी भावी सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती सूर्यकांत यांचे नाव सुचवण्यासाठी केंद्रीय कायदा मंत्रालयाला प्रस्ताव पाठवला आहे. गवई २३ नोव्हेंबर रोजी त्यांच्या पदावरून निवृत्त होत आहेत. न्यायमूर्ती सूर्यकांत २४ नोव्हेंबर रोजी सरन्यायाधीशपदी नियुक्त होतील. ९ फेब्रुवारी २०२७ पर्यंत ते या पदावर कार्यरत असतील. न्यायाधीशांच्या नियुक्ती आणि बदल्यांचे नियमन करणाऱ्या मेमोरँडम ऑफ प्रोसिजरनुसार, सर्वोच्च न्यायालयातील सर्वात वरिष्ठ आणि योग्य न्यायाधीशाला मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्त केले जाते. सरन्यायाधीश गवई यांच्यानंतर, न्यायमूर्ती सूर्यकांत हे सर्वोच्च न्यायालयातील सर्वात वरिष्ठ न्यायाधीश आहेत. सूर्यकांत २४ नोव्हेंबर रोजी भारताचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारतील.

### कुत्र्यांच्या हल्ल्यावरून न्यायालयाने सुनावले

दिल्लीः सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (दि. २७) राज्य सरकार आणि केंद्र शासित प्रदेशांचे चांगलेच कान पिळले. सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण आणण्यासाठी काही निर्देश शासनाला दिले होते. मात्र राज्य सरकारांना या निर्देशांचे पालन करता आले नाही. यामुळे सर्वोच्च न्यायालयाने देशातील राज्य सरकार आणि केंद्र शासित प्रदेशांना चांगलेच फटकारले. त्याचबरोबर ३ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या सुनावणीवेळी त्यांच्या मुख्य सचिवांना व्यक्तीशः हजर राहण्याचे आदेश देखील दिले. सर्वोच्च न्यायलाने भटक्या कुत्र्याच्या प्रश्नामुळे देशाच्या प्रतिमेला तडे जात असल्याचे देखील सांगितले.

### सागरी शक्तीमध्ये महाराष्ट्राचे मोठे योगदान –मुख्यमंत्री

मुंबईः राज्याने देशाच्या सागरी शक्तीत मोलाची भूमिका बजावली आहे. मुंबईतील बंदरे आणि जेएनपीएच्या कार्यामुळे राज्यातील उद्योग आणि व्यापार मोठ्या प्रमाणात वाढला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुंबईत सोमवारी (दि.२७) झालेल्या इंडिया मेरीटाईम वीक २०२५ या कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल आणि शंतनू ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली वाढवण बंदराचे बांधकाम सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

### धर्मादाय आयुक्तालय दोषी ठरले पाहिजे

पुणे : जैन बोर्डिंग प्रकरणात आता व्यवहार रद्द झाल्याचे गोखले बिल्डरने मेलद्वारे कळवले आहे. जैन बांधवांना यामुळे एक प्रकारे दिलासा मिळाला आहे. परंतु पुढची प्रक्रिया ही धर्मादायच्या सुनावणीनंतर समोर येणार आहे. या प्रकरणात आता सोमवारी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी जैन बोर्डिंगला भेट दिली. यावेळी त्यांनी धर्मादाय आयुक्तालय दोषी ठरले पाहिजे अशी प्रतिक्रिया माध्यमांशी बोलताना दिली आहे. धर्मादाय आणि ट्रस्टी यांच्या अधिकाराबाबत आंबेडकर यांनी भाष्य केले आहे.

### भाजप खासदार कंगना राणावतला जामीन मंजूर

भटिंडाः हिमाचल प्रदेशातील मंडी लोकसभा मतदारसंघाच्या भाजप खासदार आणि अभिनेत्री कंगना राणावत यांना सोमवारी (२७ ऑक्टोबर २०२५) मानहानीच्या प्रकरणात जामीन मंजूर करण्यात आला. २०२०–२१ च्या शेतकरी आंदोलनादरम्यान केलेल्या कथित आक्षेपार्ह टिप्पणीवरून त्यांच्यावर हा खटला दाखल करण्यात आला होता. भटिंडा येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयासमोर हजर झाल्यानंतर कंगना राणावत यांना जामीन मिळाला. न्यायालयात हजर झाल्यानंतर कंगनाने प्रसारमाध्यमांशी बोलताना आपली बाजू मांडली. ''हा निव्वळ एक गैरसमज आहे,'' असे त्या म्हणाल्या.

# हैदराबाद गॅझेटवरील राज्य सरकारच्या जीआरला स्थगिती देण्यास कोर्टाचा नकार

## मुंबई उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**हैदराबाद गॅझेटबाबत राज्य सरकारने काढलेल्या जीआरला (शासकीय निर्णय) स्थगिती देण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. मंगेश ससाणे यांच्यासह राज्यातील ओबीसी संघटनांनी या संदर्भात याचिका दाखल केली होती. मात्र, याचिकेवर तात्काळ सुनावणी घेण्यास नकार देत सुप्रीम कोर्टाने याचिकाकर्त्यांना मुंबई उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला आहे. न्यायमूर्ती विक्रमनाथ आणि**




**न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या पीठासमोर ही सुनावणी झाली.**

राज्य सरकारने २ सप्टेंबर २०२५ रोजी हैदराबाद गॅझेट संदर्भात जिआर काढला होता. या गॅझेटला स्थगिती देण्याच्या मागणीसाठी ओबीसी संघटनांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती. सोमवारी ज्येष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी याचिकाकर्त्यांच्या वतीने बाजू मांडली. न्यायालयाने याचिकाकर्त्यांना मुंबई उच्च न्यायालयात सविस्तर याचिका दाखल करण्यास सांगितले, जिथे १८ नोव्हेंबरला या संदर्भात सुनावणी ▶▶ पान २ वर

# दिवाळी संपली उसतोड मजुरांची बिऱ्हाडासह कुच

बीड । प्रतिनिधी

यावर्षी महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीचा फटका शेती पिकांना बसला. नद्यांना पुर आले होते. अतिरिक्त पावसामुळे रस्ते खरा झाले होते. उसाच्या फडात काहीदिवस पाणी असल्यामुळे यंदा उसतोडणीचा हंगाम लांबविण्यात आला. १ नोव्हेंबर रोजी राज्यभरातील सहकारी साखर कारखाने सुरू करण्यात येणार आहेत. दिवाळीचा सण



झाल्यानंतर मजूर उसतोडणीसाठी कारखान्याकडे कुच करू लागले आहेत. दररोज अनेक वाहने बीड जिल्ह्यातून इतर जिल्ह्याच्या ठिकाणी जात असल्याचे दिसून येत आहे.


सप्टेंबर महिन्यामध्ये राज्यात अतिवृष्टी झाली. त्यामुळे शेती पिकांचे मोठेनुकसान झाले. रस्ते खराब ▶▶ पान २ वर




बीड : फलटण येथे जिल्ह्याची कन्या डॉ.संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणी दोषीवर कठोर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी आज बीड मध्ये सर्वपक्षीय, सर्वधर्मीय कॅन्डल मोर्चा काढण्यात आला यावेळी गृहमंत्र्याच्या राजीनाम्याची मागणीचे फलक झळकत होते.

# ...तर निवडणुका ३ महिने लांबणार!

## विरोधी पक्षांनी आक्रमक भुमिका घेतल्यास मतदार पुनरिक्षण होण्याची शक्यता



पुणे । प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याआधीच मतदार याद्यांमधील घोळ दूर करण्यात यावा, यासाठी महाविकास आघाडीने आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. विरोधी पक्षांची ही मागणी निवडणूक आयोगाने मान्य केल्यास मतदार पुनरिक्षण कार्यक्रमामुळे महापालिकांच्या निवडणुका पुन्हा दोन ते तीन महिने लांबणीवर पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या गेल्या महिन्यांपासून रखडलेल्या निवडणुका ३१ जानेवारीपर्यंत घेण्याचे आदेशच न्यायालयाने सरकारला दिले आहेत. त्यानुसार या निवडणुका घेण्यासाठीची तयारी राज्य निवडणूक आयोगाकडून सुरू आहे. पहिल्या टप्प्यात जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, त्यानंतर नगरपालिका आणि शेवटच्या टप्प्यात महापालिकांच्या ▶▶ पान २ वर


# अजित दादांच्या कार्यालयात लावणीचा ठसका

नागपूर । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नागपूर कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या दिवाळी स्नेहमिलन कार्यक्रमात लावणीचे सादरीकरण झाल्याने नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. गणेशपेठ येथील पक्ष कार्यालयात रविवारी (दि २६) हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नागपुरातील मुख्य कार्यालय गणेश पेठ परिसरात असून अवघ्या दोन महिन्यांपूर्वीच अजित पवार यांनी कार्यालयाचे उद्घाटन केले होते. या कार्यालयात राष्ट्रवादीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसाठी दिवाळी मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नृत्यांचाही कार्यक्रम पार पडला. सोहळ्यादरम्यान 'वाजले की बारा', 'मला इश्काच्या झुल्यात झुलवा' या लावण्या सादर करण्यात आल्या. नृत्यांगना शिल्पा शाहीर यांनी नृत्य सादर केले. या लावणीला उपस्थित असलेल्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी टाळ्या आणि शिट्ट्या ▶▶ पान २ वर

# घराणेशाहीचे राजकारण आता चालणार नाही !

## केंद्रीय मंत्री अमित शाह यांचा काँग्रेस, ठाकरेंवर निशाणा



मुंबई । प्रतिनिधी

घराणेशाहीचे राजकारण आता या देशात चालणार नाही. कामगिरीच्या बळावर देशाचे नेतृत्व ठरेल. एका गरीब कुटुंबात जन्मलेला चहा विक्री करणारा मुलगा देशाचा तीनदा पंतप्रधान बनतो हे आमच्या पक्षाने दाखवून दिले असे सांगत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अप्रत्यक्षपणे ठाकरे बंधू यांच्यावर निशाणा साधला. मुंबईत भाजपा कार्यालयाच्या भूमिपूजनासाठी ते आले होते. या कार्यक्रमातून त्यांनी भाजपा आणि घराणेशाहीचे राजकारण यावर भाष्य केले.

अमित शाह म्हणाले की, जो पक्षाच्या सिद्धांतावर चालतो, ज्याच्यात कामगिरी करण्याची ताकद आहे तोच भाजपात मोठा नेता बनू शकतो. ▶▶ पान २ वर

# शेतकऱ्यांचा अंत पाहू नका ; तात्काळ कर्जमाफी देण्याची काँग्रेसची मागणी

मुंबई । प्रतिनिधी

शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये द्यावे, रब्बी हंगामासाठी बियाणे व खते मोफत द्यावीत तसेच शेतकऱ्यांचा अंत न पाहता त्यांना तात्काळ कर्जमाफी द्या. एक मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्री यांनी दिल्लीत जाऊन राज्यासाठी विशेष पॅकेज आणावे, ▶▶ पान २ वर



# उसतोडमजूराच्या चिमुकलीचा ट्रॅक्टरखाली चिरडून मृत्यू

बीड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील देवदहिफळ येथील अडीच वर्षीय आरोही विशाल बडे या चिमुकलीचा कर्नाटक राज्यातील कोल्हारजवळ ट्रॅक्टरच्या ट्रॉलीखाली चिरडून मृत्यू झाला असल्याची माहिती मिळते आहे. एकुलती एक लेक अपघातात गमावल्याने बडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, देवदहिफळ येथील महादेव बडे हे ऊसतोड मुकादम आहेत. त्यांचा मुलगा विशाल बडे हा कर्नाटक राज्यातील बैलहोंगल तालुक्यात सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याकडे ऊस वाहतुकीचे काम पाहतो. शुक्रवारी रात्री विशाल बडे हा पत्नी आरती, मुलगा अविराज आणि मुलगी आरोहीसह ट्रॅक्टरने कर्नाटककडे कामासाठी संपूर्ण कुटुंबासोबत निघाले होते. यावेळी मोठा अनर्थ घडला आणि ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२७ ऑक्टोबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २३.०० क्विंटल | २,५१० | २,७१६ | २,६१५ |
| ज्वारी/हायब्रिड : २७.५० क्विंटल | २,१०० | २,८५० | २,५८६ |
| मका/लोकल:३५.०० क्विंटल | १,९२५ | १,९२५ | १,९२५ |
| तूर : ०.५० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |
| उडीद : ११.०० क्विंटल | ३,००० | ५,१५१ | ४,०७५ |
| बाजरीः ९४.५० क्विंटल | २,३१५ | २,८१५ | २,६४२ |
| मुगः ०.५० क्विंटल | ५,२०१ | ५,२०१ | ५,२०१ |
| सोयाबीनः ६९३.५० क्विंटल | ३,४०० | ४,३५० | ४,११८ |
| हरभराः २.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |


# आजपासून महाराष्ट्र वगळता १२ राज्यांत मतदार फेरनिरीक्षण सुरू

## मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची घोषणा

नवी दिल्ली । वृतसंस्था

**मंगळवार दि. २८ ऑक्टोबरपासून देशातील १२ राज्यांमध्ये एसआयआर (विशेष सखोल फेरनिरीक्षण) करण्यात येणार असल्याची माहिती मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी पत्रकार परिषद घेत दिली आहे.**

कुमार म्हणाले की, १२ राज्यांमध्ये एसआयआरचा दुसरा टप्पा मंगळवारपासून सुरु होईल. या टप्प्यात मतदार यादी अद्ययावत केली जाईल. नवी मतदार जोडले जातील. सोबतच त्रुटी दूर केल्या जातील. दुसऱ्या टप्प्यात १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये विशेष सखोल फेरनिरीक्षण करण्यात येईल. यामध्ये अंदमान निकोबार, गोवा, पुद्दुचेरी, छत्तीसगढ, गुजरात, केरळ, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, लक्षद्विप यांचा समावेश आहे. या यादीत महाराष्ट्राचा समावेश करण्यात आलेला नाही. राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. ३१ जानेवारीपर्यंत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. महाराष्ट्रातील सगळ्या विरोधकांनी एकत्र येत मतदार याद्यांमधील घोळ निस्तरण्याची



मागणी केली होती. जोपर्यंत मतदार यादीतील गोंधळ संपत नाही, तोपर्यंत निवडणूक घेऊ नका, अशी मागणी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी राज्यातील निवडणूक आयुक्तांची भेट घेऊन केली होती. यावेळी मनसे प्रमुख राज ठाकरे त्यांच्यासोबत उपस्थित होते. आता १२ राज्यांमध्ये विशेष सखोल फेरनिरीक्षण सुरु होत असले तरी यामध्ये ▶▶ पान २ वर

# महाराष्ट्रात दरदिवशी ६१ बालकांवर अत्याचार

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात बालकांवर होत असलेल्या अत्याचाराच्या गुन्ह्यांचा आलेख चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या (एनसीआरबी) अहवालानुसार राज्यात दररोज सरासरी ६१ बालकांवर अत्याचार होत असून, त्यापैकी २४ बालकांवर लैंगिक अत्याचार होत असल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे.

२०२३ मध्ये राज्यात बालकांवरील अत्याचाराचे एकूण २२ हजार ३९० गुन्हे नोंदवले गेले होते. २०२२ च्या तुलनेत ते एक हजार ६२८ ने अधिक आहेत. संपूर्ण देशात नोंदवलेल्या गुन्ह्यांच्या तुलनेत महाराष्ट्राचा वाटा सुमारे १३ टक्के आहे. गुन्ह्यांच्या आकडेवारीनुसार मध्य प्रदेश ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# महायुतीत अविश्वासाचे वारे !

महायुती एकत्र लढणार की स्वबळावर याबाबत अजून स्पष्टता झालेली नाही. मात्र, महायुतीत अंतर्गत धुसफूस सुरू असल्याचे दिसून येत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अचानक दिल्ली वारी केल्याने त्यासंबंधीच्या चर्चेला उधाण आले आहे. आज अचानक गाठ पडे.. असा काही प्रकार दिसत नाही, पण त्यामागे काही तरी गौडबंगाल असावे असे बोलले जात आहे. मुंबईत सत्ता काबीज करण्यासाठी भाजपकडून हालचालींना वेग आला आहे. दीडशेपेक्षा अधिक उमेदवार मैदानात उतरवण्याची तयारी भाजपने चालवली आहे. त्यामुळे शिवसेना शिंदे गटाला ६० ते ७५ जागा दिल्या जातील अशी चर्चा आहे. भाजपने बीएमसीसाठी 'दीडशे पार'चा नारा दिला असतानाच अचानक उपमुख्यमंत्री शिंदे हे दिल्ली दौऱ्यावर गेले. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभुमीवर सत्तेत असलेल्या महायुतीतील भाजपा, शिंदे शिवसेना आणि अजित पवार राष्ट्रवादी यांच्यात जागांवरून चांगलीच झटापट सुरू आहे. शिंदेंची झालेली दिल्लीवारी याचसाठी होती हे स्पष्ट आहे. महायुतीतील इतर नेते आणि कार्यकत्यांची भुमिका पाहता महायुतीत अविश्वासाचे वारे वाहत असल्याचे दिसत आहे.

यापूर्वी देखील शिंदे यांनी अनेकवेळा अचानक दिल्ली दौरे केले आहेत. दिल्लीत जाऊन त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि जे. पी. नड्डा यांच्या भेटी घेतल्या होत्या. आता पुन्हा एकदा अचानक शिंदे दिल्ली दौऱ्यावर गेल्याने त्यांची ही दिल्लीवारी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण मानली जात आहे. त्यांनी अमित शहा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही भेट घेतली. त्या संदर्भात शिंदे म्हणाले, दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी पंतप्रधान मोदींची भेट घेतली. दिवाळीदरम्यान पंतप्रधान व्यस्त होते. त्यांनी मला आज वेळ दिला, म्हणून त्यांची सदिच्छा भेट घेतली. मी दिल्लीला गेलो किंवा माझ्या दरे गावी गेलो तरी चर्चा होतेच. त्यामुळे चर्चा करणारे चर्चा करतच असतात. जेव्हा जेव्हा आम्ही मोदी साहेबांची भेट घेतो तेव्हा ते विकासावर बोलतात. मग ते महाराष्ट्राच्या विकासावर असो वा देशाच्या प्रगतीवर असो. त्यामुळे त्यांना भेटल्यानंतर आम्हाला एक प्रकारची प्रेरणा मिळते. त्यांनी बाळासाहेबांच्या आठवणींना देखील उजाळा दिला. शिंदे यांनी पंतप्रधान मोदींना शाल, पुष्पगुच्छ आणि संत तुकाराम महाराजांची मूर्ती भेट दिली. केंद्र आणि राज्यातील विविध विषयांवर दोघांमध्ये सकारात्मक चर्चा झाल्याचे शिंदे यांनी बैठकीनंतर सांगितले.

महायुतीत कुठेही मतभेद होऊ नयेत. महायुतीत बेबनाव होईल अशी कोणतीही कृती किंवा वक्तव्य टाळावे, असे आवाहन त्यांनी केले खरे मात्र प्रत्यक्षात ते स्वतःचे डावपेच आखत असल्याचे दिसत आहे. सत्ताधारी भाजप त्यांच्या मित्रपक्षांना संपवण्याच्या तयारीत आहे. म्हणून उपमुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांच्या पक्षाला वाचवण्यासाठी दिल्लीला धाव घेतली आहे, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आणि शिंदे यांच्या दौऱ्यावरून भाजप, अजित पवार राष्ट्रवादी यांना डिवचण्याचा प्रयत्न केला. भाजपला त्यांचे मित्रपक्ष शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी (अजित पवार) यांना संपवून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवायच्या होत्या असाही दावा केला जात आहे. काही का असेणा पण मित्र पक्षांच्या कामाची पद्धत बघूनच शिंदे यांनी आपल्या पक्षाच्या अस्तित्वासाठी दिल्लीला धाव घेतली असे म्हणण्यास वाव आहे. भाजप, शिंदेसेना आणि राष्ट्रवादीचे (अजित पवार) तथाकथित ट्रिपल-इंजिन सरकार अंतर्गत कलहाने भरलेले आहे. तिन्ही पक्षांमध्ये तीव्र वाद आहेत. त्यामुळे युतीच्या स्थिरतेबद्दल गंभीर शंका निर्माण झाल्या आहेत. भाजपने मुंबईत 'मिशन १५०' अंतर्गत त्यापेक्षा अधिक जागा लढवण्याची तयारी सुरू केली आहे. त्यामुळे शिंदे गट व अजित पवार गट बिथरणार यात शंका नाही. भाजपने जर दीडशे जागा लढवल्या तर २२७ जागांपैकी शिंदे आणि अजित पवार गटाच्या वाट्याला किती जागा येतील याबाबतचा हा राजकीय तिढा निर्माण झाला आहे. या जागावाटपाच्या मुद्यासाठीच शिंदे यांनी दिल्ली गाठली असावी अशी चर्चा आहे. गत काही दिवसांपासून राज्यात शिंदे गट व भाजपमध्ये शीतयुद्ध सुरू असल्याच्या चर्चेने जोर धरला होता. शिंदे यांच्या कार्यकाळातील काही विकास प्रकल्पांना मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिली होती. युतीतील समन्वय साधण्यासाठी आणि राज्यातील सद्यस्थितीबद्दल भाजपच्या केंद्रीय नेतृत्वासमोर आपले गाऱ्हाणे मांडण्यासाठी शिंदे यांचा हा दिल्ली दौरा असावा, असे मानले जात आहे. उपमुख्यमंत्री शिंदे सातत्याने दिल्ली वाऱ्या करत आहेत. पुन्हा मुख्यमंत्री होण्यासाठी ते आजही प्रयत्नशील असल्याचे बोलले जाते. मध्यंतरी देवेंद्र फडणवीस भाजपचे अध्यक्ष किंवा कॅबिनेट मंत्री म्हणून दिल्लीत जातील अशी चर्चा होती. परंतु त्या चर्चांना पूर्णविराम देताना, मी कुठेही जात नाही. मुख्यमंत्रिपदासाठी २०२९ पर्यंत तरी कोणतीही व्हॅकेन्सी नाही असा अप्रत्यक्ष संदेश एकनाथ शिंदे यांना दिला होता. कारण शिंदे सुद्धा आपल्या वर्तुळात 'मी पुन्हा येईन' असे सांगत असतात म्हणे. आता घोडा मैदान जवळच असून, कोण कोणाशी कशा पद्धतीने जुळवून घेतो आणि कोण कशी कूरघोडी करतो हे काही दिवसांतच स्पष्ट होईल.

## माजी आमदाराचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

**बीड । प्रतिनिधी**

**सातारा जिल्ह्यातील फलटण येथे डॉ.संपदा मुंडे यांनी पोलीस अधिकाऱ्यांच्या छळाला कंटाळूनआत्महत्या केली.या आत्महत्या प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करण्यात यावी या मागणीसाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर माजी आ.डॉ.नारायणराव मुंडे यांच्यासह आदींचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू आहे.**

डॉ. संपदा मुंडे हिने वरिष्ठ पोलीस अधिकारी व काही राजकीय पुढाऱ्यांच्या सतत होणाऱ्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केली. आत्महत्यापुर्वी स्वतःच्या हातावर तिने दोषींची नावे लिहून ठेवलेली आहेत. सदरील हा प्रकार अत्यंत दुर्देवी असून या प्रकरणाची सखोल चौकशी होवूनसंबंधिता विरोधात कारवाई करावी यासाठी एसआयटी मार्फत चौकशीची मागणी माजी आ.डॉ.नारायणराव मुंडे यांनी केली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसाचे लाक्षणीक उपोषण करण्यात येत आहे.

## महेश सहकारी साखर कारखान्याचा परवाना तात्काळ पुनर्स्थापित करा!

# ३१ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन

### मा.आ.भिमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली सभासद, ऊस उत्पादक, शेतकरी व संचालक मंडळ एकत्र

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्याची कामधेनू म्हणून ओळख असलेल्या महेश सहकारी साखर कारखाना सुरू करण्यासाठी मा. आ.भीमरावजी धोंडे यांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळाने कर्ज रक्कम भरून कारखाना सुरू करण्यासाठी हालचाली सुरू केल्या होत्या.कारखान्याचे यंदा धुराड पेटवण्याच्या दृष्टीने प्रगतीपथावर कामकाज सुरू झाले होते.परंतु राज्य व केंद्र सरकारने परवाना रद्द केला असून रद्द केलेला परवाना पूनर्स्थापित करा या मागणीसाठी कार्यक्षेत्रातील सभासद, ऊसउत्पादक,शेतकरी व संचालक मंडळ यांचे मा.आमदार भीमरावजी धोंडे यांच्या नेतृत्वाखाली ३१ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन



करणार असल्याचा इशारा जिल्हाधिकारी ,पोलीस अधीक्षक यांच्याकडे २७ ऑक्टोबर रोजी दिलेल्या निवेदनद्वारे दिला आहे.दिलेल्या निवेदनामध्ये नमूद आहे.की महेश सहकारी साखर कारखाना बीड, अहिल्यानगर,धाराशिव ७ तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा मोठा वर्ग या कारखान्यावर अवलंबून असून मोठ्या प्रमाणावर दुष्काळी आष्टी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आष्टी तालुक्याला मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होणार होता.अनेक बेरोजगार तरुणांच्या हाताला काम लागले असते परंतु राज्य व केंद्र शासनाने या कारखान्याचा परवाना रद्द केला आहे. कारखान्यावरती असलेले बँकेचे कर्ज माजी आमदार भीमरावजी धोंडे यांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळाने नेल करून कारखान्याचे धुराडे पेटवण्याच्या दृष्टीने कामकाज प्रगतीपथावर सुरू करण्यात आले होते.परंतु सरकारने हा परवाना रद्द केल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. कारखाना कार्यरत नसल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत असून इतर कारखाने हंगाम सुरू करण्याच्या तयारीत असताना देखील आमच्या कारखान्याचे सर्व काम ठप्प झाले आहे.याच पार्श्वभूमीवर मा.आ.भिमरावजी धोंडे यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्षेत्रातील सभासद,ऊस उत्पादक शेतकरी ३१ ऑक्टोंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

# डॉ.सत्यजित आणि डॉ.शिवानी यांचा साक्षगंध सोहळा शाही थाटात संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याच्या पत्रकारिता क्षेत्रातील दिग्गज व्यक्तीमत्व आणि दैनिक झुंजारनेताचे उपसंपादक ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांची कन्या डॉ.शिवानी आणि कडा येथील आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालयाचे प्राचार्य तथा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरचे माजी व्यवस्थापन परिषद सदस्य व अधिष्ठाता डॉ.हरिदास विधाते यांचे चिरंजीव डॉ.सत्यजित यांचा साक्षगंध सोहळा तथा साखरपुडा कार्यक्रम आज रविवारी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये शाही थाटात संपन्न झाला.पत्रकारिता, शिक्षण,सामाजिक क्षेत्रामध्ये समाजाभिमुख परिवार म्हणून बोडखे परिवार व विधाते परिवाराकडे पाहिले जाते. बोडखे परिवारातील अत्यंत सालस संस्कार संपन्न अशा डॉ. शिवानी या एमबीबीएस हे उच्च शिक्षण घेऊन डॉक्टर आहेत तर प्राचार्य डा.हरिदास विधाते यांचे चिरंजीव डॉ.सत्यजित हे सुद्धा आरोग्य क्षेत्रामध्ये एमडी या पदव्युत्तर शिक्षणामधील उच्चपदस्थ आहेत.आज या रविवारच्या



शुभमंगल दिनी कडा येथील सुयोग मंगल कार्यालयात बीड, संभाजीनगर, नाशिक,मुंबई,अहिल्यानगरसह विविध भागातून आलेल्या संत महंत,राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक,शैक्षणिक,वैचारिक, पत्रकारिता आणि विविध क्षेत्रातील मान्यवर पाहुण्यांच्या ज्येष्ठ नागरिक आणि महिला भगिनींच्या उपस्थितीमध्ये हा साक्षगंध तथा साखरपुडा सोहळा संपन्न झाला. यावेळी अध्यात्मिक क्षेत्रातील संत सज्जनांनी भविष्यातील या परिवारासाठी शुभेच्छा दिल्या.या साखरपुडा सोहळ्यासाठी माजी आ.भीमराव धोंडे,सौ. दमयंतीताई धोंडे,माजी आ. साहेबराव दरेकर,माजी आ. बाळासाहेब आजबे, अजितदादा वरपे,सौ.आशाताई वरपे,युवा नेते सागर धस,हनुमंत थोरवे,महेबुब शेख,उध्दवबापु दरेकर,बाबुशेठ भंडारी,ॲड. साहेबराव म्हस्के,नियामत बेग, सतीष शिंदे,सेवानिवृत जिल्हाधिकारी सुनिल चव्हाण,मुंबई पोलीस उपायुक्त बजरंग बन्सोडे,अजय धोंडे, अभय धोंडे,रमजान तांबोळी, राजेंद्र ताठे,अदित्य ताठे,जेष्ठ पत्रकार अनंत हंबर्डे सर, आण्णासाहेब चौधरी,शिवाजी राऊत,दत्ताभाऊ काकडे, प्रा.एस.ए.सोमवंशी,एस.ए. बनसोडे,डा.दर्शना बारवकर, मनिषा चवरे,सौ.विद्या चव्हाण, संतोषभैय्या चव्हाण,डा.डी.बी. राऊत,प्राचार्य डॉ सतीशचंद्र सूर्यवंशी श्रीगोंदा,प्राचार्य डॉ. जयसिंगराव भोर,प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे, प्राचार्य दत्तात्रय वाघ,प्राचार्य डॉ खेमगर,सुनिल नाथ,युवराज पाटील,अनिल ढोबळे,धैर्यशील थोरवे,आण्णा नाथ,संजय ढोबळे,डा.अशोक गांधी, डा.सचिन टेकाडे, रामशेठ मधुरकर, सावता ससाणे, बाळासाहेब भुकन,यशवंत खंडागळे,राजेंद्र धोंडे,अशोक साळवे,ॲड.बाबुराव अनारसे, उपसभापती नामदेव धोंडे, परिवंत गायकवाड, दिलीप बन्सोडे,प्रल्हाद खेतमाळस,राम बन्सोडे,विजयशेठ मेहेर,नायब तहसिलदार भगीरथ धारक, नामदेव राऊत,विठ्ठलराव बन्सोडे,विक्रम पोकळे,पोपट घुले,ॲड.रत्नदीप निकाळजे, सिताराम पोकळे,प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे,सतीषमामा झगडे, बाळासाहेब वाघुले,दिलीप काळे, नगराध्यक्ष जिया बेग,उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, रंगाण्णा धोंडे, राजेंद्र काळे,अभय शिंदे,सुरेश वारंगुळे, सुनिल म्हेत्रे,संदीप सुंबरे,अरुण सायकड, राजेंद्र लाड,विनोद ढोबळे,मुस्ताक शेख,राजेश राऊत,रघुनाथ कर्डीले,प्रविण पोकळे,अविनाश कदम,व ईतर सर्व पत्रकार,संपतराव धोंडे,शेख अन्सारभाई, डा. उत्तम शिंदे,दादा झांजे,दवा गव्हाणे, डा.राहुल घाटूळ परभणी, बाळासाहेब शिंदे,बन्शीभाऊ पोकळे यांच्यासह ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल,ह.भ.प. आजिनाथ अंधाळे महाराज, माजी शिक्षणाधिकारी ह.भ.प पांडुरंग जाधव गुरुजी,ह.भ.प. मंदार बुवा,ह.भ.प.राऊत दादा महाराज, निळकंठ तावरे महाराज,संतोष मोरे,राजेंद्र लोखंडे महाराज,निवृत्तीदादा बोडखे महाराज,आप्पासाहेब सुंबरे महाराज, महाराज,दादा महाराज चांगुणे, यांच्यासह राजकीय,सामाजिक,शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचलन निलेश दिवटे यांनी तर या पारिवारिक कौटुंबिक सोहळ्यासाठी उपस्थित राहिलेल्या विविध क्षेत्रातील मान्यवरांचे आभार प्राचार्य डा.हरिदास विधाते यांनी मानले.

### संस्कार संपन्न परिवारासाठी संत सज्जनांचे आशीर्वाद!

आज रविवारी कडा येथील सुयोग मंगल कार्यालयात संपन्न झालेल्या बोडखे आणि विधाते परिवाराच्या साक्षगंध सोहळ्यासाठी विविध क्षेत्रातून नावलौकिक प्राप्त मान्यवरांची आवर्जून उपस्थिती होती सातत्याने इतरांसाठी योगदान देत आपल्या जीवनाची कर्तव्य पुरती करणाऱ्या या दोन्ही परिवारातील या कौटुंबिक पारिवारिक स्नेहाच्या नातेबंधनासाठी उपस्थित राहिलेल्या राजकीय आणि धार्मिक क्षेत्रातील गुनीजणांनी दोन्ही परिवाराच्या भविष्यातील यशदायी प्रवासाला मनोमन अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## पान १ वरून...

### कापसातील ओलाव्याची

असल्याने सीसीआय कापूस खरेदी करत नाही. हा कापूस शेतकऱ्यांना खुल्या बाजारात कमी भावात विकावा लागत आहे. पेरणीसाठी पैशांची गरज असल्याने शेतकरी नाईलाजाने माल विकत असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे. दरम्यान, तेलंगणाचे कृषिमंत्री तुम्माला नागेश्वरा राव यांनी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरिराजसिंह यांना पत्र लिहून कापूस खरेदीतील ओलाव्याची अट १२ टक्क्यांवरून २० टक्क्यांवर वाढविण्याची मागणी केली. असे केले तरच शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, असे राव यांनी म्हटले आहे.

------------

### दिवाळी संपली उसतोड

झाले, नद्यांना आजही पाणी वाहत आहे. उसाच्या फडात काही दिवस पाणी राहणार असल्याने यंदाचा उस तोडणीचा हंगाम लाबविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. १ नोव्हेंबरपासून राज्यभरातील कारखाने सुरू करण्यात येणार आहेत. दरवर्षी उसतोड मजुरांची दिवाळी उसाच्या फडात होत असते यंदा मात्र मजुरांची दिवाळी गावाकडे झाली आहे. आज २५ ऑक्टोंबर असुन येत्या पाच दिवसात कारखाने सुरू होणार असल्याने मजुर उसतोडणीला निघू लागले आहेत. दररोज ट्रॅक्टर, ट्रकद्वारे मजुर कारखान्याकडे जात असल्याचे दिसून येत आहे. राज्यात सर्वाधिक उसतोड मजुर बीड जिल्ह्यात आहेत. हे मजुर महाराष्ट्रासह कर्नाटक या राज्यातही उसतोडणीसाठी जात आहेत. मजुर उसतोडणीला जावू लागल्याने डोंगरी भागातील गावे ओस पडू लागले.

------------

### हैदराबाद गॅझेटवरील राज्य सरकारच्या

होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या परवानगीने ही याचिका मागे घेण्यात आली आहे, ज्यामुळे ती एक प्रकारे फेटाळल्यासारखी झाली आहे. ओबीसी आरक्षणासंदर्भात हैदराबाद गॅझेटला स्थगिती देण्याची मागणी किंवा जीआरला स्थगिती देण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे फेटाळली आहे. आता या प्रकरणाची नियमित सुनावणी मुंबई उच्च न्यायालयात होणार आहे. सुप्रीम कोर्टाच्या सल्ल्यानुसार, याचिकाकर्ते आता पुढील कार्यवाहीसाठी मुंबई हायकोर्टात जाणार आहेत आणि १८ नोव्हेंबर रोजी तिथे युक्तिवाद होण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे ओबीसी आरक्षणाच्या संदर्भातील या महत्त्वाच्या विषयावर आता मुंबई उच्च न्यायालयात काय निर्णय होतो, याकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

------------

### ...तर निवडणुका ३ महिन

निवडणुका होतील, असे निवडणूक आयोगाकडूनच स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार साधारणपणे डिसेंबरमध्ये महापालिका निवडणुका जाहीर होऊन जानेवारी महिनाअखेरपर्यंत प्रत्यक्षात मतदानाची प्रक्रिया पूर्ण होईल, असे प्रशासकीय सुत्रांकडून सांगण्यात येत आहे. मात्र, एकीकडे राज्य निवडणूक आयोगाकडून या निवडणुकांची तयारी अंतिम टप्प्यात आली असतानाच काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट, राष्ट्रवादी काँग्रेस पवार गट आणि मनसे या पक्षांनी मतदार यांद्यांमधील असलेला घोळ, त्रुटी दूर केल्यानंतरच निवडणुका घ्याव्यात, अशी आग्रही भूमिका घेतली आहे. त्यासाठी येत्या दि. १ नोव्हेंबरला हे सर्व विरोधी पक्ष रस्त्यावर उतरून आंदोलन करणार आहेत. विरोधी पक्षांचा हा आक्रमक पवित्रा कायम राहिल्यास निवडणूक आयोग काय निर्णय घेणार, याबाबत उत्सुकता आहे. मात्र, एकंदरीतच निवडणूक आयोगावर सातत्याने होत असलेले आरोप आणि मतदार याद्यांमधील त्रुटींचे जे प्रकार समोर येत आहेत, ते दूर करण्याचा निर्णय आयोगाने घेतल्यास त्याचा थेट परिणाम स्थानिक स्वराज्य निवडणुकीच्या वेळापत्रकावर पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**मतदार पुनरिक्षण कार्यक्रम राबविल्यास वेळ लागणार**

निवडणूक विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने याबाबत दिलेल्या माहितीनुसार, मतदार याद्यांमधील घोळ आणि त्रुटी दूर करायच्या असतील तर त्यासाठी मतदार पुनरिक्षण कार्यक्रम राबवावा लागेल. या कार्यक्रमासाठी किमान तीन महिन्यांचा अवधी लागेल. त्यामुळे मतदार पुनरिक्षण कार्यक्रम राबविल्यास निवडणुका किमान आणखी दोन ते तीन महिने पुन्हा लांबणीवर पडू शकतात. मात्र, त्यासाठी आयोगाला पुन्हा न्यायालयात जावे लागेल, असेही या अधिकाऱ्यांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

-------------

### घराणेशाहीचे राजकारण आता

कामगिरीच्या बळावरच देशाचे नेतृत्व ठरेल. घराणेशाहीचे राजकारण आता चालणार नाही. नरेंद्र मोदी हे उत्तम उदाहरण आहे. गरीब चहावाल्याच्या घरात जन्मलेला मुलगा, त्याचा त्याग, समर्पण, देशभक्तीच्या आधारे या देशाचा पंतप्रधान बनतो. ३ वेळा पंतप्रधानपद सांभाळण्याचे संधी मिळते. लोकशाही पक्षात आपला विश्वास किती दृढ आहे हे दिसून येते. जे पक्ष त्यांच्या संघटनेच्या कामकाजात लोकशाही आणू शकत नाही. ते पक्ष देशातील लोकशाहीचे कधी रक्षण करू शकत नाहीत असा टोला त्यांनी लगावला. तसेच भाजपच्या नवीन कार्यालयाचे भूमिपूजन करत आहोत पण जिल्हा मुख्यालयाचे काम बाकी आहे. प्रत्येक जिल्ह्यात डिसेंबर २०२६ पर्यंत भाजपाचं कार्यालय असायला हवे असे अमित शाह यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना सूचना केल्या. शत प्रतिशत भाजपाच्या दिशेने आपण वाटचाल करत आहोत. अनेक बड्या नेत्यांनी आयुष्य पक्षासाठी आणि देशसेवेसाठी वेचले. त्यांच्या कामाचे फळ म्हणून आज जिल्हा परिषदेपासून पंचायत समितीपासून देशभर भाजपा पसरली असेही अमित शाह यांनी म्हटले.

**विरोधकांचा सुपडासाफ करा**

जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, महापालिका या सर्व निवडणुकीत इतक्या ताकदीने भाजपा कार्यकर्त्यांनी लढावे, जेणेकरून विरोधकांचा सुपडा साफ होईल. दुर्बिण घेऊनही ते दिसायला नको, एवढ्या आवेशाने आपल्याला लढायचे आहे, असे आवाहन अमित शाह यांनी कार्यकर्त्यांना केले.

----------------

### अजित दादांच्या कार्यालयात

वाजवून प्रतिसाद दिला. हा व्हिडिओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे.

---------

### उसतोडमजूराच्या चिमुकलीचा

काही क्षणात होत्याचे नव्हते झाले. रविवार सकाळी कोल्हारजवळ नाश्ता, चहापाणी करुन हे कुटुंब पुन्हा साखर कारखान्याच्या दिशेने निघाले होते. यावेळी आरोही समोरील ट्रॉलीत आपल्या आईच्या कुशीत बसली होती. मात्र, काही कळायच्या आत अचानक ती आईच्या हातातून निसटली. हातातून निसटून ती पाठीमागील ट्रॉलीच्या चाकाखाली आली. ट्रॉलीच्या चाकाखाली आल्यामुळे आरोहीचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर आई-वडिलांनी केलेला टाहो हृदय पिळवटून टाकणारा होता.

------------

### शेतकऱ्यांचा अंत पाहू नका ; तात्काळ

असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे. प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, महायुती सरकारने राज्य दिवाळखोरीत काढले असल्याने त्यांच्याकडे योजनांसाठी पैसाच नाही. पंतप्रधान आवास योजनेसाठी पैसे नाहीत, लाडकी बहिण योजनेसाठी पैसे देऊ शकत नाहीत. पंतप्रधान महाराष्ट्रात येणार म्हणून शेतकऱ्यांना ३२ हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले, हे पॅकेज फसवे आहे हे आम्ही आधीच सांगितले होते आता या पॅकेजचा फोलपणा समोर येत असून, हे पॅकेज एक थोतांड आहे. असे ते म्हणाले.

**मराठवाड्यातील शेतकऱ्याच्या मदतीची उद्धव ठाकरे करणार शहानिशा**

माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे पुन्हा एकदा मराठवाड्यातील शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. ५ ते ८ नोव्हेंबर अशा चार दिवसांच्या मराठवाडा दौऱ्यावर ते जाणार आहेत. या दौऱ्यात उद्धव ठाकरे थेट अतिवृष्टीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या घरी जाऊन सरकारने केलेल्या मदतीच्या दाव्यांची शहानिशा करणार आहेत, तसेच सरकारी मदतीचे वास्तव जनतेसमोर आणणार आहेत. संभाजीनगरपासून परभणीपर्यंत हा शेतकरी जनसंवाद दौरा असणार आहे. संभाजीनगर, धाराशिव, बीड, जालना, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांतील शेतकऱ्यांशी ते संवाद साधणार आहेत. ते जवळपास २० ते २५ गावांना भेटी देणार असून, प्रत्येक दिवशी कमीतकमी ५ ते ६ गावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत.

-----------

### महाराष्ट्रात दरदिवशी

२२ हजार ३९३ गुन्ह्यांसह प्रथम, तर महाराष्ट्र २२ हजार ३९० गुन्ह्यांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. दर लाख बालकांमागील गुन्ह्यांचा दर लक्षात घेतल्यास महाराष्ट्र देशात दहाव्या स्थानी असून येथे दर लाख बालकांमागे ६१ गुन्हे नोंदले गेले आहेत. सर्वाधिक गुन्ह्यांचा दर अंदमान आणि निकोबार बेटे (१४३.४), दिल्ली (१४०.३), चंदीगड (९०.७), आसाम (८४.२) आणि मध्य प्रदेश (७७.९) मध्ये आहे. क्राय संस्थेच्या विश्लेषणानुसार महाराष्ट्रातील सर्वाधिक बालकांवरील गुन्ह्यांनुसार मुंबईत जिल्ह्यात (३,११०), ठाण्यात (१,६३८), पुण्यात (१,२३४), मीरा-भाईंदरमध्ये (१,०१६) आणि पुणे ग्रामीण (८७८) जिल्ह्यांमध्ये नोंदले गेले आहेत. लहान मुलांवरील वाढते अत्याचार रोखण्यासाठी पोलिसांनी ठोस उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

**अपहरणांचे प्रमाण अधिक**

राज्यातील गुन्ह्यांमध्ये १२ हजारांहून अधिक गुन्हे अपहरणाशी संबंधित आहेत. त्याचबरोबर, आठ हजारांहून अधिक गुन्हे लैंगिक अत्याचाराशी संबंधित आहेत, ज्यात मुंबईत १,११०, ठाणे ४४७, पुणे ४३१, पुणे ग्रामीण ४०० आणि मीरा भाईंदर-वसई विरारमध्ये ३३३ गुन्हे नोंदले गेले आहेत.

---------

### आजपासून महाराष्ट्र वगळता १२ राज्यांत

महाराष्ट्राचा समावेश नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका जुन्याच मतदारयाद्यांच्या आधारे होणार ही बाब स्पष्ट झाली आहे.

**कोणतेही अतिरिक्त कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार म्हणाले की, ज्या राज्यांमध्ये एसआयआर केले जाईल त्या सर्व मतदार यादी गोठवल्या जातील. त्या यादीतील सर्व मतदारांना बीएलओ कडून युनिक गणन फॉर्म दिले जातील. या गणन फॉर्ममध्ये सध्याच्या मतदार यादीतील सर्व आवश्यक तपशील असतील. विद्यमान मतदारांना फॉर्म वाटण्यास सुरुवात झाल्यानंतर, ज्यांची नावे गणन फॉर्ममध्ये आहेत ते सर्व त्यांची नावे २००३ च्या मतदार यादीत होती की नाही हे जुळवण्याचा प्रयत्न करतील. त्यांना कोणतेही अतिरिक्त कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही. एखाद्याचे मतदार यादीमध्ये नाव नसेल, परंतु त्यांच्या पालकांची नावे यादीत असतील, तर त्यांना कोणतेही अतिरिक्त कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही. २००२ ते २००४ पर्यंतची मतदार यादी र्हीीिं://ींशिीी.शलळ.सेीं.ळप वर कोणीही पाहू शकेल आणि ते स्वतः पडताळणी करू शकतात.

------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा.... नवे विचार.....

मंगळवार दि. २८ ऑक्टोबर २०२५



# तिन सदस्याच्या समितीने नदीकाठच्या शेतकऱ्यांना सोडले वाऱ्यावर



## आमदार साहेब, तहसिलदार, कृषि अधिकारी, बीडीओ यांच्यात शेतकऱ्यांविषयी उदासिनता

### तात्काळ पंचनामे न झाल्यास अमरण उपोषणाचा शेतकऱ्यांचा इशारा

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील नद्यांना महापुर येउन साधारणतः जवळपास एक महिणा लोटला असुन या महापुरामुळे नदीकाठच्या बाधित शेतक-यांच्या पिकाचे, विहीरींचे व खरडुन गेलेल्या जमिनीचे पंचनामे करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी तीन सदस्यांची समिती नियुक्त केली होती मात्र आपसांतील मतभेदांमुळे व समन्वयाच्या अभावामुळे या तिन सदस्यांच्या समितीने अद्यापही बाधित जमिनीचे पंचनामे केले नसुन हे नुकसान शासन देत आहे. परंतु अधिका-यांच्या मस्तवाल धोरण शेतक-यांच्या पदरात पडण्यास अडचणी निर्माण करत आहे. त्यामुळे आमदार साहेब येणा-या दोन दिवसांत आपण या अधिका-यांची बैठक घेवुन या बाधित शेतक-यांचे पंचनामे पुर्ण करावेत अन्यथा तहसिल कार्यालयासमोर अमरण उपोषण करण्याचा इशारा मोगरा येथील शेतक-यांनी दिला आहे.

माजलगाव तालुक्यामध्ये प्रामुख्याने सिंदफणा व गोदावरी या मोठ्या नद्या आहेत. या नद्याला महापुर आल्यामुळे मोगरा गावाला पाण्याचा अजगरी विळखा पडला होता. या अजगरी विळख्यात साधारणतः २५ ते ३० शेतक-यांचे उभे पिक नासुन गेले. यामध्ये कापुस, सोयाबीन या पिकांवर पाच फुट उंचीपर्यंतचे पाणी आठ दिवस होते. अशी दयनीय अवस्था या पिकांची झाली होती. साधारण १५ ते २० दिवस झाल्यानंतर आजही या पिकांचे करायचे काय ? पंचनामे झाल्याशिवाय शेतक-यांना शेतीची मशागत करणे अवघड झाले आहे आणि हे मस्तवाल अधिकारी आपसांतील भांडणात शेतक-यांना वा-यावर सोडत आहेत. या त्रिस्तरीय समितींमध्ये कृषि सहाय्यक, तलाठी व ग्रामसेवक यांनी मिळुन हे पंचनामे करावेत असे शासनादेश असतांना सुध्दा या मंडळींनी शेतक-यांची क्रुर चेष्टा लावली आहे. आमदार आपण आजच या तिनही अधिका-यांना सुचना करून हे पंचनामे तात्काळ करावेत व हा अहवाल शासनाकडुन सरकारकडे पोहचवावा ज्यामुळे शेतक-यांना आर्थिक मदततर मिळेलच परंतु या जमिनीची मशागत करून त्यांना या जमिनीची ओटी भरण्यासाठी रब्बीची पेरणी करता येईल हे पंचनामे जर तात्काळ न झाले तर उपोषणाशिवाय आम्हां शेतक-यांना पर्याय नाही असा इशारा मोगरा गावातील शेतक-यांनी दिलेल्या निवेदनात दिला आहे. यासंबंधी तहसिलदार यांना विचारले असता त्यांनी पुर्णतः हा विषय कृषि खात्याकडे आहे असे सांगुन आपली जबाबदारी झटकली तर कृषि अधिकारी यांना याबाबत विचारणा केली असता आम्हाला तहसिलकडुन याबाबत कोणतेच सहकार्य मिळत नसल्याचे सांगुन त्यांनीही जबाबदारी झटकली. कार्यालयाचे आपसांत जमत नाही मात्र याचा फटका शेतक-यांना बसतो आहे. याचा पुर्णतः सन्माननीय मार्ग आमदार महोदयांनी काढावा अशी मागणी शेतकरी वर्गातुन होत आहे. यावेळी उमेश मोगरेकर, तुकाराम राठोड, बळीराम चव्हाण, गणेश जाधव, प्रकाश खिस्ते यांचेसह मोगरा गावातील अनेक शेतकरी उपस्थित होते.

# पात्रुडमध्ये रेशन दुकानदाराची मनमानी

## दिवाळी-सणासुदीच्या काळात रेशन वाटपास दांडी

### तहसीलदारांची डोळेझाक; जिल्हा पुरवठा अधिकारी लक्ष घालणार का?

पात्रुड । प्रतिनिधी

दिवाळीसारख्या सणासुदीच्या काळात गरीब व गरजू नागरिकांना शासनाच्या रेशनद्वारे दिलासा मिळावा, यासाठी शासन नियमितपणे धान्य, साखर, इत्यादी वस्तूंचे वाटप करण्याचे आदेश देते. मात्र पात्रुड येथील एका रेशनदुकानदाराने नागरिकांना धान्य न देत, मनमानी सुरू केल्याची गंभीर तक्रार पुढे आली आहे. यामुळे पात्रुड परिसरातील शेकडो गरीब ग्राहकांना दिवाळीच्या काळात मोठ्या अडचणींचा सामना लागला.

स्थानिक नागरिकांनी सांगितले की, दुकानदाराकडून धान्य वितरणात अकार्यक्षमता, रांगेत उभ्या असलेल्या ग्राहकांशी उद्धट वागणूक, तसेच ''धान्य संपले'' अशा सबबी दाखवत ग्राहकांना रिकाम्या हाताने परत पाठवले जाते. त्यामुळे लोकांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे. ही परिस्थिती स्थानिक नागरिकांच्या नाराजीचे आणखी एक कारण ठरत आहे. सदरील रेशनदुकानदार ज्या वेळेस मनात येईल तेव्हा दुकान उघडतो आणि मनाप्रमाणेच बंद करतो, असा आरोप ग्राहकांनी केला आहे. ठराविक वेळेचे पालन न केल्याने लोकांना वारंवार दुकानाजवळ चकरा माराव्या लागतात. अनेक वेळा वृद्ध, महिला आणि दिव्यांगांना देखील धान्य मिळवण्यासाठी तासन्?तास प्रतीक्षा करावी लागते. ''शासनाने ठरवून दिलेल्या वेळेत दुकान सुरू ठेवणे ही दुकानदाराची जबाबदारी आहे. मात्र येथे रेशनदुकानदार अक्षरशः मनमानी करत असून, प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी तत्काळ चौकशी करून संबंधित दुकानदारावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांसह सामाजिक संघटनांकडून होत आहे. नागरिकांनी शासनाकडे अशी मागणी केली आहे की, संबंधित रेशनदुकानदारावर निलंबनाची कारवाई करून पारदर्शक पद्धतीने धान्य वितरण सुनिश्चित करण्यात यावे, जेणेकरून भविष्यात गरीब जनतेला अन्याय सहन करावा लागू नये.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात )गट जिल्हा सरचिटणीस नईम आतार यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

''सणासुदीच्या काळात अशा निष्काळजी व मनमानी करणाऱ्या रेशनदुकानदारावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी,'' अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच या प्रकरणात तहसीलदारांनी डोळेझाक केल्याचा आरोप करत जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी स्वतः लक्ष घालून चौकशी करावी, अशीही त्यांनी मागणी केली आहे. सदरील प्रकरणातज लवकरात लवकर न्याय न मिळाल्यास आम्ही रस्त्यावर उतरून आंदोलन करू असा इशाराही आतार यांनी दिला आहे.

## पान ६ वरून...

### कॉपर वायर चोर

शिवाजी बंटेवाड यांना देवुन आरोपीस ताब्यात घेवुन त्याच्याकडे विचारपुस केली असता त्यांनी सदर गुन्ह्यातील तांब्याची तार, त्यांचे इतर साथीदार नामे ३) सतिष रघुनाथ मुंडे रा.नागदरा ता. परळी वैजनाथ ४) सलीम शेख रा. केज जि. बीड असेंनी मिळुन चोरी केल्याची कबुली देवुन चोरीतील मुद्देमाल काढुन दिल्याने त्यांच्याकडुन चोरीस गेलेल्या मुद्देमालापैकी १४० किलो तांब्याची तार किमंती अंदाजे १,२६,०००/-रूपये प्रमाणे जप्त करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत,अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मँडम व पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड स्थानिक गुन्हे शाखा बीड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि सुशांत सुतळे, पोह १४२९ रामचंद्र केकान, ९८९ विष्णु सानप, १९१८ गोविंद भताने, पोअ १०५५ सचिन आंधळे यांनी केली आहे.

# महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणी दोषीवर कारवाई करा -शिवसेना

बीड । प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना नेते तथा माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब,संप्रकप्रमुख परशुराम जाधव साहेब , महिला आघाडीच्या जिल्हा संपर्कसंघटिका संपदाताई गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर, शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका मीराताई नवले, तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन , शेख यास्मिन ताई , मुजाहित बाजी यांच्या प्रमुख उपस्थितीत आज फलटण येथे ग्रामीण उपरुगणालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या ,व गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील कवडगाव येथील रहिवासी डॉ.संपदाताई मुंढे यांच्या आत्महत्येस कारणीभूत असलेल्या पी.आ. बधने व बनकर यांची एस आय.टी . चौकशी झाली पाहिजे व त्यांना कठोरातली कठोर शिक्षा झालीच पाहिजे या मागणीसाठी बीड जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयात संबंधित अधिकारी यांना निवेदन देण्यात आले, यावेळी शेख बिलाल भाई, मुकेश घुमरे , रमेश नवले,आरतीताई थोरात , केशरबाई थोरात , यांच्यासहित शिवसैनिक व महिला आघाडीच्या कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पत्रकार कमलाकर कुलथे यांचे दु:खद निधन

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील पत्रकार तथा माजलगाव टाइम्सचे निवासी संपादक कमलाकर एकनाथराव कुलथे यांचे सोमवार दिनांक २७ ऑक्टोबर रोजी सकाळी सातच्या सुमारास दुःखद निधन झाले. त्यांच्यावर बीड येथील अमरधाम स्मशानभूमी मध्ये सायंकाळी सहा वाजता अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आप्तेष्ठ, नातेवाईक, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. मृत्यू समयी त्यांचे वय पन्नास वर्षे होते.

मूळचे माजलगावचे असलेले कमलाकर एकनाथराव कुलथे गेल्या पंचवीस वर्षापासून बीड शहरांमध्ये माजलगाव टाइम्स या वृत्तपत्राचे काम करत होते.



माजलगाव टाईम्सचे निवासी संपादक म्हणून ते बीडमध्ये कार्यरत होते. प्रदीर्घकाळ त्यांनी पत्रकारिता केली. गेल्या काही दिवसापासून त्यांना ह्रदयविकाराचा आजार झाल्याने संभाजीनगर येथील बजाज हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते .त्यांच्यावर बायपासची शस्त्रक्रिया करण्यात आली होती. प्रकृती स्थिर असतानाच अचानक त्यांना मूत्रपिंडाचा त्रास होऊ लागल्याने प्रकृती अचानक बिघडली आणि यात उपचार चालू असताना त्यांचे सोमवारी सकाळी सातच्या सुमारास निधन झाले. त्यांच्यावर बीड येथील मोंढा भागातील अमरधाम स्मशान भूमी मध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी माजी आमदार प्रा. सुनील धांडे, सामाजिक कार्यकर्त्या प्रा. सूशीलाताई मोराळे, भास्कर काका बागडे, संपादक दिलीप खिस्ती यांच्यासह बीड शहरातील संपादक, पत्रकार, माजलगाव येथील पत्रकार ,त्यांचे नातेवाईक स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, भाऊ,भावजया,पुतणे, असा मोठा परिवार आहे.

कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार आष्टी यांचे कार्यालय
(दंडविभाग) ता.आष्टी जि.बीड
E-Mail ID: tahsildarashti@gmail.com
दूरध्वनी क्रमांक ०२४४१-२८२५४२
क्र.२०२५ दंडविभाग/ जन्म/कावि- दि. स्वाक्षरी खालील

**जाहीरनामा**

जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये

सर्व जनतेस मोजे. आष्टी ता. आष्टी. जि. बीड यांना जाहीर केले जाते कि, अर्जदार. नामे **मिर्झा कदीर रौफ बेग रा. आष्टी ता. आष्टी जि.बीड** यांनी त्यांचे बहीण नामे, फौजीया बेगम रौफ बेग जन्म दि.११/०२/१९८२ रोजी मोजे. आष्टी ता. आष्टी जि.बीड येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे यांची बहीण यांचे कायदेशीर जन्म दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शावीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्यावावतचं प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १५/१०/२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

**आदेशावरुन**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार आष्टी**

कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार आष्टी यांचे कार्यालय
(दंडविभाग) ता.आष्टी जि.बीड
E-Mail ID: tahsildarashti@gmail.com
दूरध्वनी क्रमांक ०२४४१-२८२५४२
क्र.२०२५ दंडविभाग/ जन्म/कावि- दि. स्वाक्षरी खालील

**जाहीरनामा**

जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये

सर्व जनतेस मोजे. किन्ही ता. आष्टी. जि. बीड यांना जाहीर केले जाते कि, अर्जदार. नामे **रज्जाक उस्मान पठाण रा. किन्ही ता. आष्टी जि.बीड** यांनी त्यांचे स्वतः नामे, रज्जाक उस्मान पठाण जन्म दि.०५/०२/१९६४ रोजी मोजे. किन्ही ता. आष्टी जि.बीड येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे यांची स्वतः यांचे कायदेशीर जन्म दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शावीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्यावावतचं प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १५/१०/२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

**आदेशावरुन**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार आष्टी**

कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार आष्टी यांचे कार्यालय
(दंडविभाग) ता.आष्टी जि.बीड
E-Mail ID: tahsildarashti@gmail.com
दूरध्वनी क्रमांक ०२४४१-२८२५४२
क्र.२०२५ दंडविभाग/ जन्म/कावि- दि. स्वाक्षरी खालील

**जाहीरनामा**

जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये

सर्व जनतेस मोजे. हातोला ता. आष्टी. जि. बीड यांना जाहीर केले जाते कि, अर्जदार. नामे **अकबर नामदार शेख रा. हातोला ता.आष्टी जि.बीड** यांनी त्यांचे नात नामे, शामील शौकत शेया जन्म दि.०९/०४/२००५ रोजी मोजे. हातोला ता. आष्टी जि.बीड येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे यांची नात यांचे कायदेशीर जन्म दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शावीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्यावावतचं प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १५/१०/२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

**आदेशावरुन**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार आष्टी**

क्र.२०२५/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि-
तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पाटोदा
दि. ई स्वाक्षरीत

**जाहिरनामा**

जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये

पाटोदा तालुक्यातील सर्व जनतेस जाहिर केले जाते की, अर्जदार खाडे नामदेव कोंडिबा रा. करंजवन ता. पाटोदा जि. बीड यांनी त्यांचा स्वतःचा जन्म दिनांक १३/११/१९५७ रोजी मौजे करंजवन येथे झाला आहे, त्याच्या जन्माये आदेश मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे

करिता सदरहू अर्जदाराचे कायदेशीर जन्माचे दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसाच्या त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळयाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे जन्माचे नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल,

आज दि. ई स्वाक्षरीत रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.

**आदेशावरुन**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार पाटोदा**

कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार आष्टी यांचे कार्यालय
(दंडविभाग) ता.आष्टी जि.बीड
E-Mail ID: tahsildarashti@gmail.com
दूरध्वनी क्रमांक ०२४४१-२८२५४२
क्र.२०२५ दंडविभाग/ जन्म/कावि- दि. स्वाक्षरी खालील

**जाहीरनामा**

जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये

सर्व जनतेस मोजे. किन्ही ता. आष्टी. जि. बीड यांना जाहीर केले जाते कि, अर्जदार. नामे **कलंदर तुराब पठाण रा. किन्ही ता. आष्टी जि.बीड** यांनी त्यांचे स्वतः नामे, कलंदर तुराब पठाण जन्म दि.०५/१०/१९६३ रोजी मोजे. किन्ही ता. आष्टी जि.बीड येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे यांची स्वतः यांचे कायदेशीर जन्म दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शावीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्यावावतचं प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १५/१०/२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

**आदेशावरुन**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार आष्टी**

कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार आष्टी यांचे कार्यालय
(दंडविभाग) ता.आष्टी जि.बीड
E-Mail ID: tahsildarashti@gmail.com
दूरध्वनी क्रमांक ०२४४१-२८२५४२
क्र.२०२५ दंडविभाग/ जन्म/कावि- दि. स्वाक्षरी खालील

**जाहीरनामा**

जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये

सर्व जनतेस मोजे. भाळवनी ता. आष्टी. जि. बीड यांना जाहीर केले जाते कि, अर्जदार. नामे **दगडू याकूब पठाण रा. भाळवनी ता. आष्टी जि.बीड** यांनी त्यांचे स्वतः नामे, दगडू याकूब पठाण जन्म दि.१५/०७/१९६२ रोजी मोजे. भाळवनी ता. आष्टी जि.बीड येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे यांची स्वतः यांचे कायदेशीर जन्म दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शावीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्यावावतचं प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १५/१०/२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

**आदेशावरुन**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार आष्टी**

कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार आष्टी यांचे कार्यालय
(दंडविभाग) ता.आष्टी जि.बीड
E-Mail ID: tahsildarashti@gmail.com
दूरध्वनी क्रमांक ०२४४१-२८२५४२
क्र.२०२५ दंडविभाग/ जन्म/कावि- दि. स्वाक्षरी खालील

**जाहीरनामा**

जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये

सर्व जनतेस मोजे. कडा ता. आष्टी. जि. बीड यांना जाहीर केले जाते कि, अर्जदार. नामे **सय्यद बादशहा बापूभाई रा. रूईनालकोल ता.आष्टी जि.बीड** यांनी त्यांचे मुलगी नामे, सय्यद अमरीन बादशहा जन्म दि.०९/०४/२००९ रोजी मोजे. कडा ता. आष्टी जि.बीड येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे यांची मुलगी यांचे कायदेशीर जन्म दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शावीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्यावावतचं प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १५/१०/२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

**आदेशावरुन**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार आष्टी**

कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार आष्टी यांचे कार्यालय
(दंडविभाग) ता.आष्टी जि.बीड
E-Mail ID: tahsildarashti@gmail.com
दूरध्वनी क्रमांक ०२४४१-२८२५४२
क्र.२०२५ दंडविभाग/ जन्म/कावि- दि. स्वाक्षरी खालील

**जाहीरनामा**

जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये

सर्व जनतेस मोजे. आष्टी ता. आष्टी. जि. बीड यांना जाहीर केले जाते कि, अर्जदार. नामे **मिर्झा कदीर रौफ बेग रा. आष्टी ता.आष्टी जि.बीड** यांनी त्यांचे मुलगी नामे, शिफा कदीर बेग जन्म दि.११/०२/२००५ रोजी मोजे. आष्टी ता. आष्टी जि.बीड येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे यांची मुलगी यांचे कायदेशीर जन्म दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शावीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्यावावतचं प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. १५/१०/२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

**आदेशावरुन**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार आष्टी**

# गळ्यात कांद्याच्या माळा घालत शेतकऱ्यांचं आंदोलन

## खासदार अमोल कोल्हेंची सरकारवर टीका

सध्या कांद्याच्या दरात सातत्यानं घसरण होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. या पडणाऱ्या दरामुळं राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी संकटात आहे. याच मुद्यावरुन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी सरकारवर टीका केली आहे. कांदा निर्यात धोरणातील धरसोडपणामुळे शेतकऱ्यांना अतोनात नुकसान सहन करावे लागले आहे. त्यातच गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव देखील मिळाला नाही. या परिस्थितीमुळे गांजलेल्या शेतकऱ्यांनी आज दिल्ली येथे खांद्यावर कांद्याची पिशवी आणि गळ्यात कांद्याच्या माळा घालून अर्धनग्न अवस्थेत आंदोलन करीत केंद्र शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.



या आंदोलनात शिरुर तालुक्यातील सागर फराटे, विजय साळुंके, परशुराम मचाले आणि नवनाथ फराटे आदी शेतकरी बांधव सहभागी झाले. कृषी, वाणिज्य तथा प्रधानमंत्री कार्यालय या ठिकाणी या शेतकऱ्यांनी आपला आवाज पोहोचविण्याचा प्रयत्न केला. हे आंदोलन म्हणजे कांदा उत्पादक शेतकरी बांधवांचा आक्रोश आहे. या पीकाच्या संदर्भाने गेल्या काही वर्षांत शेतकऱ्यांची जी ससेहोलपट होतेय, ती संपूर्ण देश पाहतोय अशे मत कोल्हे यांनी व्यक्त केले. याबाबत संसदेत मी स्वतः अनेकदा भूमिका मांडून शेतकऱ्यांचे म्हणणे शासनापुढे मांडले आहे.

आपल्या मतदारसंघातील शेतकरी बांधवांनी आज जी आंदोलनाची भूमिका घेतली ही एका उद्वेगातून आलेली आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या मागणीची दखल घ्यावी. शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे कांदा उत्पादकांची जी फरफट चाललेली आहे ती कोणत्याही परिस्थितीत थांबलीच पाहिजे ही आमची ठाम भूमिका असल्याचे कोल्हे म्हणाले.

कांद्याच्या दरात सातत्याने घसरण

कांद्याच्या दरात सातत्याने घसरण होत आहे. यामुळे कांदा उत्पादक शेतकरी हवालदिल झाला असून कांदा दर वाढीची मागणी केली जात आहे. मात्र शासनाकडून कोणताही निर्णय होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष आहे. कांदा उत्पादनासाठी झालेला उत्पादन खर्च देखिल वसूल होत नाही.

इतकेच नाही तर कांद्याच्या दरात वाढ होईल; या आशेने शेतकऱ्यांनी चाळीमध्ये कांदा साठवणूक करून ठेवला आहे. मात्र हा कांदा देखील किती दिवस साठवून ठेवायचा असा प्रश्न देखील आहे. दरम्यान दरवाढीच्या मागणीसाठी राज्यात अनेक ठिकाणी शेतकरी आंदोलन करण्याची शक्यता आहे.

## ‘या’जातीची शेळी पाळा अन् कमवा मोठा नफा कमवा



सध्या शेळीच्या ठेंगण्या किंवा लहान जातीचे पालन करण्याची क्रेझ शेतकऱ्यांमध्ये वाढत आहे. कारण या शेळ्यांची काळजी घेण्यासाठी फारशी मेहनत घ्यावी लागत नाही. आणि या शेळ्या कमी खर्चात सुद्धा चांगला नफा देतात. अशीच एक शेळीची जात आहे ‘नायजेरियन वार्फ’. शेळीची ही जात दिसायला अगदी लहान असली तरी नफा देण्याच्या दृष्टीने इतर जातीच्या शेळ्यांपेक्षा खूपच सरस आहे, आणि या शेळ्यांच्या संगोपनात फारसा पैसा खर्च करावा लागत नाही.

शारीरिक ठेवण : नायजेरियन वार्फ शेळी ही पश्चिम आफ्रिकन वंशाची शेळीची जात आहे. या शेळ्या खूप मजबूत आणि काटक असतात. या शेळ्या सुमारे १० वर्षे जगतात. नावाप्रमाणेच या शेळ्या उंचीला ठेंगण्या आणि काळ्या, पांढऱ्या, तपकिरी, लाल आणि सोनेरी अशा विविध असतात. पूर्ण वाढ झालेल्या शेळीचे सरासरी वजन १७ ते २५ किलोपर्यंत असते, लांबी २४ ते ३० इंच असते आणि उंची १६ ते २० इंच असते.प्रजोत्पादन माहिती : नायजेरियन वार्फ शेळ्यांचा प्रजनन दर इतरांपेक्षा जास्त असतो. ते वर्षभर प्रजनन करू शकतात. एक शेळी सरासरी २ ते ४ पिलांना जन्म देते. ते साधारण ६ ते ७ महिन्यांत माजावर येतात आणि दूध देऊ लागतात. या शेळ्यांचा गर्भधारणा कालावधी १४५ ते १५३ दिवसांचा असतो.

सर्वाधिक दूध उत्पादन क्षमता : नायजेरियन ड्वार्फ शेळी ही मांस आणि दूध उत्पादनासाठी सर्वोत्तम जात मानली जाते. इतर शेळयांच्या शरीराच्या आकाराच्या तुलनेत जास्त दूध उत्पादक आहेत. ही शेळी दररोज १.८ ते २ लिटर दूध देते. याशिवाय त्याचे मांसही बाजारात चांगल्या दराने विकले जाते. त्यांचे पालन करून शेतकरी बांधव दर महिन्याला बंपर नफा मिळवू शकतात.संगोपन : या शेळ्यांसाठी तुम्ही बांधलेले आवार अतिशय स्वच्छ असावे. वेंटिलेशन प्रणाली आणि सांडपाण्याचा प्रवाह चांगला असावा. शेळ्यांना पुरेशा प्रमाणात पोषक आहार देण्याचा प्रयत्न करा. त्यांना हिरव्या भाज्या खाऊ घालणे खूप फायदेशीर आहे. याशिवाय या शेळ्यांना पुरेसे पाणी द्यावे लागते.

## जनावरांना होणारा सांसर्गिक श्वसनलिकेचा आजार

सांसर्गिक श्वसनलिका दाह हा जनावरांच्यामध्ये होणारा अत्यंत संसर्गजन्य विषाणूजन्य आजार आहे. कमी वय असलेली जनावरे जास्त बळी पडतात. हरपिजविरीडी कुळातील बोव्हाईन हरपिज व्हायरस टाइप-१ या विषाणूमुळे हा आजार होतो.

प्रसार : आजारातून बऱ्या झालेल्या जनावरांमध्ये हा विषाणू सीआयडी आणि ट्रायजेमिनल गँगलियामध्ये अव्यक्त राहतो आणि पोषक वातावरण मिळाल्यानंतर वेळोवेळी व्यक्त होऊन स्त्रावाद्वारे शरीरातून बाहेर पडतो. बाधित जनावरांच्या शरीरातून अनुनासिक स्त्राव, खोकला, जननेंद्रियातील व गर्भाशयातील स्त्राव, वीर्य इत्यादी द्वारे विषाणू बाहेर फेकला जातो. दूषित हवेद्वारे आजाराचा प्रसार होतो. गोठविलेल्या वीर्यामध्ये या रोगाचे विषाणू जवळपास एक वर्षभरापर्यंत जिवंत राहू शकतात.

लक्षणे : ताप येतो.डोळ्यांचा दाह. नाकातून जास्तीचा स्त्राव बाहेर पडतो तसेच स्त्रावामुळे नाकपुड्या बंद होतात व श्वसनाचा त्रास होतो जनावरे तोंडाद्वारे श्वास घेऊ लागतात. श्लेषमल स्त्रावामुळे श्वासनलिका अरुंद होते. ब्रोंकोनीमोनियामुळे मृत्यू सुद्धा उद्भवू शकतो. विषाणूमुळे होणाऱ्या सांसर्गिक श्वसनलिका दाह या आजाराचा संसर्ग अगदी लहान वासरामध्ये सुद्धा सामान्य आहे. श्वसन संस्थेच्या सहभागाची कोणतीही लक्षणे नसलेली स्थिती तीव्र आणि सामान्यतः घातक ठरू शकते.



हा आजार पश्च्युलार वोल्वो वजायनायटिस, क्वायटल एक्झांथेमा, वोसिक्युलर वोनेरियल डिसीज, वेसिकलर वजायनाइटिस इत्यादी नावाने सुद्धा ओळखला जातो. प्रामुख्याने म्हशींच्या व गायींच्या जननेंद्रियावर फोड येऊन जखमा होतात. रेड्याच्या किंवा बैलाच्या जननेंद्रियावर देखील जखमा होतात. जननेंद्रियाची श्लेष्मल त्वचा लाल गडद होते. त्यावर फोड येतात. संक्रमित रेड्याच्या/बैलाच्या वीर्यामधून विषाणू बाहेर पडत असले कारणाने अशा रेड्यांनी म्हैस भरवल्यास एक ते तीन दिवसांमध्ये म्हशीमध्ये आजाराची लक्षणे दिसण्यास सुरवात होते.

घातक परिणाम : सामान्यतः सांसर्गिक श्वसनलिका दाह आजारामध्ये श्वसनलिकेच्या संदर्भातील लक्षणे दाखविल्यानंतर गोठ्यामधील किंवा कळपातील ६० टक्के पर्यंत गाभण म्हशींमध्ये गर्भपात होऊ शकतो. गर्भपात हा गर्भधारणेच्या कोणत्याही टप्प्यावर होऊ शकतो. परंतु सर्वात जास्त वेळा तो तिसऱ्या तिमाहीत म्हणजेच ७ ते १० महिन्यात होण्याचा धोका असतो. संक्रमित रेड्याच्या/बैलाच्या वीर्यामधून विषाणू बाहेर पडत असले कारणाने अशा संक्रमित रेड्यापासून म्हैस भरवू नये.

प्रतिबंध उपाय : गोठ्यात नवीन जनावरे खरेदी करताना आयबीआर साठी चाचणी करावी.


ज्या जनावरामध्ये आयबीआरव्ही ची लागण नाही असेच जनावर खरेदी करावे. भारतामध्ये या आजाराच्या नियंत्रणासाठी लस उपलब्ध नाही.उपचार : आजाराची लक्षणे आढळताच ताबडतोब पशुवैद्यकाशी संपर्क साधून उपचार करावेत.

## पीक संरक्षणासाठी बीजप्रक्रिया महत्त्वाची

पिकांच्या दर्जेदार उत्पादनासाठी वाण निवड, सुयोग्य जमिनीची निवड, सिंचन- खत व्यवस्थापन, पीक संरक्षण आदी बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. यासोबतच लागवडीपूर्वी बियाणास शिफारशीत घटकांची बीजप्रक्रिया करणे अत्यंत आवश्यक आहे. लागवडीसाठी हलके, कीड-रोगमुक्त, आकाराने लहान बियाणांची निवड महत्त्वाची ठरते. जमिनीतून तसेच बियाण्याद्वारे पसरणाऱ्या कीड-रोगांपासून संरक्षण होण्यासाठी पेरणीपूर्वी बियाणास जैविक व रासायनिक घटकांची बीजप्रक्रिया महत्त्वाची ठरते. बीजप्रक्रियेमुळे बियाणांभोवती जैविक व रासायनिक बुरशीनाशकांचे सुरक्षित कवच तयार होते. त्यामुळे रोपांचे रोगांपासून संरक्षण होण्यास मदत होते.

बीजप्रक्रियेचे महत्त्व : बहुतांश कीड-रोगांच्या अवस्था या जमिनीमध्ये सुप्तावस्थेत असतात. पोषक वातावरण मिळताच त्यांचा पिकावर प्रादुर्भाव दिसून येतो. पिकांवर येणाऱ्या रोगांना कारणीभूत असलेल्या बऱ्याच सूक्ष्मजीवांचा प्रसार जमिनीतून व बियाणांद्वारे होत असतो. हाच प्रादुर्भाव कमी करून पिकांची सशक्त व जोमदार वाढ होण्यासाठी पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करणे आवश्यक आहे. त्यामुळे पीक उगवणीच्या तसेच वाढीच्या प्राथमिक अवस्थेत होणारा कीड-रोगांच्या प्रादुर्भाव अटकाव करण्यास मदत मिळते.

घ्यावयाची काळजी : बीजप्रक्रिया करताना शिफारशीत जैविक तसेच रासायनिक घटकांचा शिफारशीत प्रमाणात वापर होईल याची काळजी घ्यावी. कमी किंवा जास्त प्रमाणात वापर झाल्यास त्याचे अपेक्षित परिणाम मिळत नाहीत. बीजप्रक्रिया केलेले बियाणे लगेच हवाबंद डब्यात किंवा प्लास्टिक पिशवीत भरू नये. बीजप्रक्रिया केल्यानंतर बियाणे थंड व कोरड्या जागी सावलीत किमान २४ ते ४८ तास सुकण्यास ठेवावे. त्यानंतरच पेरणी करावी. बीजप्रक्रिया करणाऱ्या व्यक्तीने



हातामध्ये हातमोजे किंवा प्लास्टिक पिशवीचा वापर करावा. जेणेकरून रासायनिक घटकांचा हातासोबत संपर्क होणार नाही.

डोळ्यांवर चष्मा तसेच नाकाला रुमाल बांधावा अथवा मास्क वापरावा. : बीजप्रक्रिया केलेले आणि पेरणीनंतर शिल्लक राहिलेले बियाणे जनावरांच्या किंवा मानवी खाण्यात येणार नाही याची काळजी घ्यावी. विकत घेतलेल्या बियाणांवर बुरशीनाशक आणि कीटकनाशकांची बीजप्रक्रिया केली असल्यास अशा बियाणांवर फक्त जिवाणू खतांची बीजप्रक्रिया करावी. बीजप्रक्रिया करताना तंबाखू खाणे, पाणी पिणे, सिगारेट ओढणे टाळावे.

बीजप्रक्रिया करण्याच्या पद्धती : बियाणे कापडी पिशवीत ठेवून ही पिशवी गरम पाण्यात ठेवावी. काही वेळानंतर बियाण्याची पिशवी गरम पाण्यातून काढून काही वेळासाठी थंड पाण्यामध्ये ठेवावी. त्यानंतर बियाणे सुकण्यासाठी ठेवून लगेच बीजप्रक्रिया करून पेरणी करावी. २५० ग्रॅम जिवाणू संवर्धकाचे पाकीट १० ते १५ किलो बियाण्यास वापरावे. एक लिटर गरम पाण्यात १५० ते २५० ग्रॅम गूळ टाकून द्रावण तयार करावे. द्रावण थंड झाल्यावर त्यामध्ये २५० ग्रॅम जिवाणू संवर्धक मिसळावे. त्यानंतर दहा किलो बियाणे स्वच्छ जागेवर प्लास्टिक किंवा ताडपत्रीवर बियाणांचा पातळ थर पसरून त्यावर तयार केलेले मिश्रण शिंपडावे.

हलक्या हाताने बियाणांस समप्रमाणात लेप बसेल असे हळुवारपणे लावावे. बीजप्रक्रिया करताना बियाणाचा पृष्ठभाग (साल) खराब होणार नाही, याची काळजी घ्यावी. त्यानंतर प्रक्रिया केलेले बियाणे सावलीत स्वच्छ कागदावर सुकवावे. बीजप्रक्रिया केलेल्या बियाणांची २४ तासांच्या आत पेरणी करावी. बियाण्यास प्रथम रासायनिक बुरशीनाशकाची प्रक्रिया केल्यानंतर दोन ते तीन तासांनी हलके बियाणे वेगळे करावे. त्यानंतर जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा, रायझोबिअम, ॲझोटोबॅक्टर तसेच स्फुरद विरघळविणारे जिवाणू खत यांचे मिश्रण करून लावावे.

बीजप्रक्रियेकरिता ट्रायकोडर्मा वापर : सर्व रब्बी पिकांमध्ये (हरभरा, ज्वारी, गहू, ऊस, मका इत्यादी) ट्रायकोडर्मा (१ टक्के डब्ल्यूपी) ५ ते १० ग्रॅम प्रतिकिलो बियाणे या प्रमाणे बीजप्रक्रिया करावी. ट्रायकोडर्माची बीजप्रक्रिया केल्यामुळे मर व मूळकूज व खोडकूज, कॉलर रॉट, कोरडी मूळकूज या रोगांपासून पिकाचे संरक्षण होण्यास मदत होते.

विविध पिकांसाठी बीजप्रक्रिया : पीक पिकास जमिनीतून व बियाण्यापासून होणारे रोग बीजप्रक्रिया प्रमाण (प्रति किलो बियाणे) हरभरा मर व मूळकूज व खोडकूज कार्बेन्डाझिम (५० टक्के डब्ल्यूपी) किंवा थायरम (७५ टक्के डब्ल्यूएस) किंवा कार्बोक्सिन (३७.५ टक्के) अधिक थायरम (३७.५ टक्के डब्ल्यूपी) किंवा कार्बेन्डाझिम (२५ टक्के) अधिक मॅन्कोझेब (५० टक्के डबल्यू. पी.) ३ ते ५ ग्रॅम. ज्वारी दाण्यावरील बुरशी व करपा थायरम (७५ टक्के डब्ल्यूएस) किंवा कार्बोक्सिन (३७.५ टक्के) अधिक थायरम(३७.५ टक्के डब्ल्यूपी) ३ ते ५ ग्रॅम. केवडा/गोसावी मेटालॅक्झिल (३१.८ ई.एस) २ मिलि. गहू पानावरील करपा/काजळी किंवा काणी/ तांबेरा थायरम (७५ टक्के डब्ल्यू. एस.) किंवा टेब्यूकोनॅझोल (२ टक्के डी.एस.) ३ ते ५ ग्रॅम.बीजप्रक्रियेचे फायदे : उगवण चांगली होण्यास मदत मिळते. तसेच पिकांची मुळे सशक्त होऊन पिकाची जोमदार वाढ होते. जमिनीद्वारे तसेच बियाणांद्वारे उद्भवणाऱ्या रोगांना अटकाव करता येतो. पेरणीसाठी एकसारखे बियाणे उपलब्ध होते व पेरणी सुलभ होते. रासायनिक खतांची २० ते २५ टक्के बचत होते. जमिनीतून व बियाणांद्वारे पसरणाऱ्या रोगांचा प्रादुर्भाव टाळता येतो. बीजप्रक्रियेमुळे बियाणाभोवती जैविक व रासायनिक बुरशीनाशकांचे सुरक्षित कवच तयार होते. त्यामुळे रोपांचे रोगांपासून संरक्षण होण्यास मदत होते. पीक संरक्षणावर होणारा अतिरिक्त खर्च कमी होतो. साठवणुकीदरम्यान बियाण्याचे रोगांपासून संरक्षण होते.




### महत्वाच्या घटना

१४२० : बीजिंगला अधिकृतपणे मिंग साम्राज्याची राजधानी म्हणून नियुक्त केले गेले.
१४९० : क्रिस्टोफर कोलंबस पहिल्या प्रवासानंतर क्युबा मध्ये पोहोचले.
१६३६ : अमेरिकेतील हारवर्ड विद्यापीठाची स्थापना
१८८६ : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ग्रोव्हर क्लीव्हलँड यांनी स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा राष्ट्राला अर्पण केला.
१९०४ : पनामा आणि उरुग्वे यांच्यात राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले.
१९२२ : बेनिटो मुसोलिनीच्या नेतृत्त्वाखाली ईटलीतील फॅसिस्टांनी रोममधील सरकार उलथवले.
१९४० : दुसरे महायुद्ध ईटलीने ग्रीसवर हल्ला केला.
१९६९ : तारापूर अणूवीज निर्मिती केंद्र सुरू झाले


### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६७ : मार्गारेट नोबल ऊर्फ ‘भगिनी निवेदिता’ स्वामी विवेकानंदांच्या शिष्या, भारतीय संस्कृतीच्या आणि स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्या, त्या मूळच्या आयरिश होत्या. २५ मार्च १८९८ रोजी स्वामी विवेकानंदांनी त्यांना विधिवत ब्रम्हचारिणी व्रताची दीक्षा दिली व त्यांचे नाव ‘निवेदिता‘ ठेवले. (मृत्यू: १३ ऑक्टोबर १९११)
१८९३ : शंकर केशव कानेटकर ऊर्फ ’कवी गिरीश’ (मृत्यू: ४ डिसेंबर १९७३)
१९३० : लालजी पाण्डेय तथा ’अंजान’ हिन्दी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध गीतकार (मृत्यू: १३ सप्टेंबर १९९७)
१९५५ : इन्द्रा नूयी भारतीय वंशाच्या अमेरिकन कॉर्पोरेट अधिकारी
१९५५ : बिल गेटस मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक
१९५६ : मोहम्मद अहमदिनेजाद ईराणचे ६ वे राष्ट्राध्यक्ष
१९५८ : अशोक चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, सांस्कृतिक कार्यमंत्री, उद्योगमंत्री आणि खाणकाममंत्री
१९६७ : ज्यूलिया रॉबर्टस अमेरिकन अभिनेत्री
१९७९ : युट्यूब चे सहसंस्थापक जावेद करीम यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६२७ : जहांगीर ४ था मुघल सम्राट (जन्म: ३० ऑगस्ट १५६९)
१८११ : हिज हायनेस राजराजेश्वर सवाई श्रीमंत यशवंतराव होळकर बहादूर (जन्म: ३ डिसेंबर १७७६)
१९०० : मॅक्समुल्लर जर्मन विचारवंत (जन्म: ६ डिसेंबर १८२३)
१९४४ : हेलन व्हाईट डॉक्टरेट मिळवणारी पहिली अमेरिकन महिला (जन्म: २८ नोव्हेंबर १८५३)
२००२ : एच अँड एम चे संस्थापक इर्लिंग पर्स्सन यांचे निधन. (जन्म: २१ जानेवारी १९१७)
२०१० : ग्रीनलँड देशाचे पहिले पंतप्रधान जोनाथन मोट्झफेल्ड यांचे निधन. (जन्म: २५ सप्टेंबर १९३८)
२०१३ : भारतीय लेखक राजेंद्र यादव यांचे निधन. (जन्म: २८ ऑगस्ट १९२९)

## उसातील रेड रॉट रोगावर असे मिळवा नियंत्रण



ऊस लागवड करणारे शेतकरी सध्या चिंतेत आहेत. कारण उसाच्या पिकावर रेड रॉट रोगाचा प्रादुर्भाव झाला असून त्यामुळे उसाच्या उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. या रोगाचा प्रादुर्भाव झालेला ऊस सुकतो आणि पिकाचे नुकसान होते. उसाचे वेळीच रेड रॉट रोगापासून संरक्षण केल्यास नुकसान कमी करता येते.

या रोगापासून होते मोठी हानी :रेड रॉट रोग हा उसाचा रोग आहे. या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यानंतर उसाचे पीक वाचवणे कठीण होते. अशा स्थितीत शेतकऱ्यांनी हा रोग त्याच्या सुरुवातीच्या टप्प्यातच रोखला पाहिजे. यासाठी शेतकऱ्याने जागरुक होणे गरजेचे आहे. रेड रॉट रोग हा उसाचा धोकादायक रोग असल्याचे कृषी तज्ज्ञ सांगतात. या रोगामुळे पिकाचे संपूर्ण नुकसान होते. सध्या ऊसाच्या को-२३८ जातीवर या रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे.

रेड रॉट रोगाची लक्षणे :या रोगाने बाधित उसाची तिसरी-चौथी पाने पिवळी पडू लागतात, त्यामुळे संपूर्ण ऊस सुकू लागतो. उसाचे खोड ताणले असता त्यावर तांबूस रंगाचे पांढरे ठिपके दिसतात. स्टेमला स्पर्श करताना दारूसारखा वास येतो. गाठीतून ऊस सहज तुटतो. हा एक बुरशीजन्य रोग आहे ज्यावर इलाज नाही, एकदा का पिकाला या रोगाची लागण झाली की त्यावर इलाज नाही, पण सावधगिरीने आणि जागरूकतेने पिकाला या रोगापासून वाचवता येते.

रेड रॉट रोग टाळण्यासाठी उपाययोजना :शेतकऱ्यांनी जमिनीवर जैव बुरशीनाशकाची प्रक्रिया करावी. लागवडीसाठी निरोगी बियाणे निवडा. उसाच्यालागवडीसाठी कोळ-१५०२३, कोलख-१४२०१, कोसा-१३२३५, को-११८ इत्यादी रोग प्रतिरोधक वाण निवडा. उसाच्या तुकड्यांवर बुरशीनाशकाची प्रक्रिया केल्यानंतरच लागवड करावी. रोगग्रस्त शेतातील पाणी निरोगी शेतात जाऊ देऊ नका.

# ऊस वाहतुकीसाठी अडथळा निर्माण करणारे विजेचे खांब व तारा काढा-अभिमन्यू खोतकर



जालना । प्रतिनिधी

जालना तालुक्यातील जालना–-कारला– भाटेपुरी रस्त्यावर ऊस वाहतुकीसाठी अडथळा ठरणारे विजेचे खांब व विजेच्या तारा त्वरित हटवा अशा सूचना युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिल्या. आज भाटेपुरी ,खाणेपुरी, कारला, ममदाबाद, वानडगाव, कचरेवाडी येथील शेतकऱ्यांनी शिवसेना नेते आमदार अर्जुनरावजी खोतकर व युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर यांची भेट घेऊन ऊस वाहतुकीसाठी येणारे अडथळे दूर करावेत अशी मागणी केली. याची तात्काळ दखल घेऊन युवा सेनेचे सचिव अभिमन्यू खोतकर यांनी शेतकऱ्याचे शिष्टमंडळ घेऊन अधीक्षक अभियंता श्री सरग यांच्या महावितरणच्या कार्यालयात बैठक घेतली व जालना –भाटेपुरी– कारला रस्त्यावर अनेक ठिकाणी विजेची क्रॉसिंग आहे. यामध्ये प्रामुख्याने ११ . . एल.टी. लाईन गावठाण फिटरच्या लाईनचा समावेश असून सध्या शेतकऱ्यांच्या ऊस तोडणी हंगाम सुरू आहे. या रोडवर अनेक ठिकाणी लाईन क्रॉसिंग मुळे व पोलची उंची कमी असल्यामुळे उसाची वाहतूक करणाऱ्या वाहनास अडथळा निर्माण होत आहे .अनेक ठिकाणी बांबू द्वारे विजयाच्या तारा वर करून ऊस वाहतूक करणारे वाहने काढावे लागतात. यामुळे अनेकदा स्पार्किंग होऊन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनेक ठिकाणी स्पार्किंग होऊन वीज खंडित होते. त्यामुळे गैरसोय होत आहे. यामुळे काही ठिकाणी गावकरी वीज बंद करून देत नाही .यामधून संघर्ष निर्माण होतो .या भागातील ऊस उत्पादक शेतकऱ्यासमोर एका अडचण निर्माण झालेली आहे. याची तात्काळ दखल घ्यावी व ऊस वाहतुकीस अडथळा ठरणारे विजेचे पोल विजेच्या तारा त्वरित हाटविण्यात याव्यात व शेतकऱ्यांची ऊस वाहतुकीसाठी येणारी अडचण दुर करावी. अशी सूचना आदेश युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर यांनी संबंधित अधीक्षक अभियंता श्री सरग व कार्यकारी अभियंता पेन्शलवार यांना दिले .अभिमन्यू खोतकर यांच्या सुचणाची अधिक्षक अभियंता श्री सरग यांनी तात्काळ दखल घेतली व संबंधित अधिकारी ,लाईनमन व एजन्सीला आदेशित करून त्वरित सर्वेक्षण करावे व अंदाजपत्रके सादर करून मंजुरी घ्यावी व ऊस वाहतुकीसाठी येणारा अडथळा दूर करावा असे आदेश केले. व लवकर ही मागणी पुर्ण करण्यात येईल असे आश्वासन दिले.

## संभाजीनगरहून दिल्लीसाठी आता एअर इंडियाची दुसरी सेवा सुरू

संभाजीनगर । प्रतिनिधी

एअर इंडियाने चिकलठाणा विमानतळावरून बंद केलेली दिल्लीसाठीची दुसरी सेवा शनिवारी (२६ ऑक्टोबर) पासून पुन्हा सुरू केली आहे. अनेक दिवसांच्या खंडानंतर सुरू झालेल्या या विमानसेवेची सुरुवात झाली असताना प्रवाशांकडून प्रतिसाद मिळेल की नाही याबाबत शंका होती. मात्र, दुपारी दिलेल्या विमानात १८० पैकी १७० प्रवासी भरल्याने ही सेवा फायदेशीर असल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, दुसरीकडे पाच शहरांसाठीच्या विमानसेवेच्या वेळतही बदल झालाय. जाणून घ्या... दिल्लीहून सकाळी ६ वाजता संभाजीनगरसाठी निघणारे एअर इंडियाचे विमान सकाळी ८ वाजता पोहोचते आणि परतीसाठी सकाळी ८.४० वाजता निघून दिल्लीला सकाळी १०.३५ वाजता पोहोचते. यानंतर दुपारी २ वाजता दिल्लीहून निघणारे विमान दुपारी ३.५० वाजता संभाजीनगर विमानतळावर येते. परतीसाठी दुपारी ४.३० वा. निघणारे विमान सा. ६.२० वा. दिल्लीत पोहोचते.

एअर इंडियाने शीतकालीन सत्रात दुसऱ्या विमानाचा समावेश केला असून दिल्लीसाठीच्या विमानाला ९५ टक्के प्रवासी भार असल्याचे नोंदवले गेले आहे. छत्रपती संभाजीनगरहून इंडिगोची एक दिल्लीसाठी सेवा असून मुंबईसाठी इंडिगोच्या दोन सेवा आहेत. एअर इंडियाची मुंबईसाठीची सेवा मिळावी यासाठी औरंगाबाद टुरिझम डेव्हलपमेंट फाउंडेशन प्रयत्नशील आहे, असे राजपूत यांनी सांगितले. इंडिगो विमानसेवेने जाहीर केलेल्या हिवाळी विमानसेवा वेळापत्रकात छत्रपती संभाजीनगरसाठी नवीन एकही विमानसेवा सुरू करण्यात आलेली नाही. २६ ऑक्टोबर २०२५ ते २८ मार्च २०२६ या कालावधीसाठी जाहीर झालेल्या या वेळापत्रकात ५ शहरांचा समावेश आहे. यामध्ये सर्व विमानांच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. प्रवाशांना आपल्या प्रवासाचे नवीन वेळापत्रकानुसार पुन्हा नियोजन करावे लागेल. एअर इंडियाची दिल्लीसाठीची एक अतिरिक्त सेवा वाढली आहे. आता दिल्ली येथून सकाळी ६ वा. विमान उड्डाण घेऊन संभाजीनगरला सकाळी ८ वा. लँड होईल. परतीसाठी सकाळी ८.४० वा. निघून सकाळी १०. ३५ दिल्ली येथे पोहोचेल. दुपारच्या सत्रात दिल्ली येथून दुपारी २ वा. निघून दुपारी ३.५० वा. संभाजीनगरला पोहोचणार आहे.

## अतिवृष्टी अनुदानातून वगळल्याने परभणीतील शेतकरी आक्रमक

### गोदावरी नदीपात्रात उतरत केले जलसमाधी आंदोलन, लेखी आश्वासनानंतर माघार



परभणी । प्रतिनिधी

अतिवृष्टी अनुदानाच्या यादीतून वगळल्याच्या निषेधार्थ परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यातील कासापुरी मंडळातील शेतकऱ्यांनी आज गोदावरी नदीपात्रात उतरून जलसमाधी आंदोलन केले. सप्टेंबर महिन्यात कासापुरी मंडळात झालेल्या अतिवृष्टीची आकडेवारी 'स्कायमेट' या संस्थेने कमी दाखवल्यामुळे हे मंडळ सरकारी अनुदानातून वगळले गेल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या निषेधार्थ, शेतकऱ्यांनी ढालेगाव बंधाऱ्यातून थेट गोदावरी पात्रात प्रवेश करत आंदोलन सुरू केले. जवळपास दोन तास हे आंदोलन गोदावरीच्या नदीपात्रात सुरू होते. आंदोलनाची माहिती मिळताच तहसीलदार, पोलीस अधिकारी आणि कृषी अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. प्रशासनाने आंदोलक शेतकऱ्यांशी चर्चा करून, २७ ऑक्टोबर रोजी स्कायमेट कंपनीचे प्रतिनिधी, शेतकरी आणि सर्व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले. या लेखी आश्वासनानंतर शेतकऱ्यांनी आपले जलसमाधी आंदोलन मागे घेतले.

राज्यात गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांत जनजीवन विस्कळीत झाले होते. नद्या–नाल्यांना आलेल्या पुरामुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

पूर आणि अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची उभी पिके पूर्णपणे आडवी झाली, तर काही ठिकाणी पिकासह जमीनही वाहून गेली होती. यामुळे जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवले आहे. आपातग्रस्त मृत व्यक्तीच्या वारसांना ४ लाख अर्थसाहाय्य मिळेल. ६० टक्क्यांहून अधिक अपंगत्व आल्यास २.५० लाख आणि जखमी व्यक्ती रुग्णालयात दाखल असल्यास ५,४०० ते १६,००० रुपयांपर्यंत मदत मिळणार आहे. पूर्णतः नष्ट झालेल्या घरांसाठी (पक्क्या/कच्च्या) सपाट भागात १.२० लाख, तर डोंगराळ भागात १.३० लाख आणि अंशतः पडझड झालेल्या घरांसाठी ६,५०० (पक्के) ते ४,००० (कच्चे) पर्यंत मदत दिली जाईल. झोपडीसाठी ८,००० आणि गोठ्यासाठी ३,००० रुपयांची मदत मिळणार आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून, सरकारकडून जाहीर करण्यात आलेली केवळ ८५ रुपये प्रति गुंठा इतकी मदत शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत द्यावी, बागायती शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये, तसेच सोयाबीनची हमीभावाने खरेदी आणि भावांतर योजना लागू करण्यात यावी, या प्रमुख मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२७. सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ''सोयाबीनची होळी आणि सरकारच्या नावाने शिमगा'' करत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषीमंत्री यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड, आम आदमी पार्टी जिल्हाध्यक्ष अशोक येडे, इंटक जिल्हाध्यक्ष रामधन जमाले आदी सहभागी होते.सरकारने जाहीर केलेली ८५ रुपये गुंठा मदत अत्यल्प आहे. त्यामुळे सरकारने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत जाहीर करावी.तसेच बागायती क्षेत्रधारकांना जिरायती क्षेत्राप्रमाणेच मदत देणे अन्यायकारक आहे. बीड जिल्ह्यात सुमारे २ लाख हेक्टर बागायती क्षेत्र असून, जिल्हा प्रशासनाने केवळ १८ हजार हेक्टर क्षेत्र गृहीत धरले आहे, हा अन्याय तातडीने दूर करण्यात यावा. सोयाबीन पिकावर उत्पादन खर्च वाढला असून मजुरी, गुत्ते पद्धतीने काढणी या खर्चामुळे शेतकरी तोट्यात जात आहे. सध्याच्या घडीला बाजारात सोयाबीनला फक्त ₹३५०० ते ₹३८०० प्रति क्विंटल दर मिळत आहे, तर केंद्र सरकारचा हमीभाव ₹५३३८ प्रति क्विंटल आहे. म्हणून सरकारने तातडीने नाफेड शासकीय खरेदी केंद्रे सुरू करून शेतकऱ्यांची आर्थिक लूट थांबवावी. (इ) मध्यप्रदेशप्रमाणे ''भावांतर योजना'' सुरू करावी मध्यप्रदेश सरकारने यंदापासून ''भावांतर योजना'' लागू केली असून, बाजारभाव हमीभावापेक्षा कमी मिळाल्यास ती तफावत शासन शेतकऱ्यांना भरून देत आहे. महाराष्ट्र शासनाने या योजनेचा आदर्श घेऊन राज्यातही ''भावांतर योजना'' लागू करावी, अशी मागणी आंदोलनातून करण्यात आली.

## ध्येय ठरवा आणि जिद्दीने प्रयत्न करा; यश स्वत:हून समोर येते-डॉ. आदिती सारडा



बीड । प्रतिनिधी

शैक्षणिक, सामाजिक आणि कृषी शिक्षण क्षेत्रात यश संपादन करण्यासाठी स्पष्ट ध्येय ठरवा आणि अथक परिश्रम करा, कारण जिद्द आणि मेहनती समोर यश स्वतःहून उभं राहतं असे प्रेरणादायी विचार आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी व्यक्त केले. आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी महाविद्यालयात नवप्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागतार्थ फ्रेशर्स पार्टीचा जल्लोषात समारोप झाला. हा कार्यक्रम संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलनाने करण्यात आली. मंचावर डॉ. आदिती सारडा, महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा, डॉ. सातपुते, डॉ. निर्मला ठोके, डॉ. रामप्रसाद मोरे, डॉ. मुंढे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. आदिती सारडा यांनी विद्यार्थांना संस्थेने उपलब्ध करून दिलेल्या सुविधांचा लाभ घेऊन ज्ञानार्जन करावे. गुरूजनांचा आदर करून शिस्त प्रिय विद्यार्थी बनावे. आणि आपल्या ध्येयाकडे वाटचाल करावी असे आवाहन डॉ. आदिती सारडा यांनी केले.

प्राचार्य श्याम भुतडा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सांगितले की, ''तरुण कृषी पदवीधरांमध्ये प्रचंड क्षमता आहे. भविष्यात जैवतंत्रज्ञान, कृषी तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान यांच्या समन्वयातून भारतीय शेतीत मोठी प्रगती साधता येईल.'' फ्रेशर्स पार्टीत विद्यार्थ्यांनी गायन, नृत्य, शेरो–शायरी आणि मनोरंजनात्मक खेळांतून आपले कलागुण सादर केले.

संपूर्ण सभागृहात टाळ्यांचा कडकडाट आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या कार्यक्रमात मिस्टर फ्रेशर म्हणून मोरे साहिल, तर मिस फ्रेशर म्हणून आडे बबली यांची निवड करण्यात आली.

शेवटी सर्व नवप्रवेशित विद्यार्थ्यांनी वरिष्ठ आणि शिक्षकवर्गासोबत संवाद साधत आपली नवीन शैक्षणिक वाटचाल उत्साहात सुरू केली. नवप्रवेशित विद्यार्थ्यांनी विविध रंगतदार कलाविष्कार सादर करत उपस्थितांचे मन जिंकले.विद्यार्थ्यांच्या नृत्य, गायन आणि शेरो–शायरीने फ्रेशर पार्टी रंगतदार झाली. मनोरंजनात्मक खेळांतून विद्यार्थ्यांचा उत्साह ओसंडून वाहिला. मिस्टर फ्रेशर म्हणून मोरे साहिल तर मिस फ्रेशर म्हणून आडे बबली यांची निवड करण्यात आली.

## नगर शहरातील ओढ्या नाल्यांची झाली कचराकुंडी



अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर शहर स्वच्छ राहावे, असे प्रत्येकालाच वाटते पण ते स्वच्छ राहावे यासाठी फारसे प्रयत्न होताना दिसत नाहीत. महानगर पालिकेवर स्वच्छतेची जबाबदारी असली तरी अनेक बेशिस्त नागरिक, अस्वच्छता वाढवीत आहेत. शहरातील ओढे व नाल्यांची सफाई करण्यावर कोट्यवधींचा खर्च होतो. परंतू, अनेक बेशिस्त नागरिक त्यात कचरा टाकून मानव निर्मित संकटाला आमंत्रण देत आहेत. शहरात सिना नदी सुमारे १४ किलोमीटरचा प्रवास करते. मोठ्या ओढ्या व नाल्यांची संख्या सुमारे २१ आहे.

जोरदार पावसामुळे हे ओढे नाले तुडुंब भरतात. ज्या ठिकाणापर्यंत मशिन जाऊ शकते तेथे चांगल्या पद्धतीने स्वच्छता होते.परंतु,अरुंद ठिकाणी कर्मचाऱ्यांमार्फतच स्वच्छता करावी लागते. अतिक्रमणांमुळे कोंडलेला श्वास अन्? त्यात टाकलेला कचरा यामुळे शहरातील ओढे दुर्गंधीचा हॉटस्पॉट बनले आहेत. अहिल्यानगर–छत्रपती संभाजी नगर मार्गावरील बारवेजवळचा ओढा, मिस्किन मळा, पत्रकार चौक या परिसरातील ओढ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा फेकला आहे. त्यामुळे पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा निर्माण होऊन, त्यात डासअळ्यांची निर्मिती होत आहे. त्यामुळे मलेरियाच्या फैलावाचीही भिती वाढली आहे. महानगर पालिकेने उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी जनतेमधून होत आहे. अहिल्यानगर ते छत्रपती संभाजीनगर रस्त्यावर बारवेजवळील ओढ्यात मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जातो. छाया : दीपक कांबळे. शहरात तब्बल ६१ किलोमीटरचे ओढे–नाले नगर शहरात छोटे–मोठे मिळून २१ ओढे–नाले असून, त्यांची एकत्रित लांबी सुमारे ६१ किलोमीटर आहे. अतिक्रमणांमुळे नैसर्गिक प्रवाहच बदलण्याचा प्रकार होत आहे. अशा स्थितीत नाल्यात कचरा फेकला जात असल्याने प्रवाहाला अडथळा होऊन, साचलेल्या पाण्यातून दुर्गंधी येत आहे. नकाशावर काही ठिकाणी ओढे–नाले नाहीत, पम ते प्रत्यक्ष जागेवर आहेत. या नाल्यांचे नैसर्गीक प्रवाह खुले ठेवणे गरजेचे आहे. अन्यथा ते मोठे मानवनिर्मीत संकट ठरणार आहे. त्याचा त्रास सर्वांना होता, लोकांनी काळजी घेतली पाहिजे. ते खुले ठेऊन कचरा वेस्ट टाकू नये. या ओढ्या नाल्यांचे रुंदीकरण करून त्याला सुशोभीत करण्याची गरज आहे, असे मनपाचे सेवानिवृत्त अभियंता सुरेश इथापे यांनी सांगितले.

**जाहीर प्रगटन**

सर्व आम जनतेस खास करुन मौजे निमगाव (मायंबा), ता. शिरुर कासार, जि. बीड, येथील शिवारातील तमाम जजनतेस सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार नामे शहादेव पि. साहेबराव बाबर, रा. निमगाव मायंबा, ता. शिरुर का., जि. बीड, यांनी दाखवलेल्या कागदपत्रांवरुन व दिलेल्या अधिकारपत्रांवरुन व सुचनांवरुन त्यांचे एकत्र कुटुंबातील मिळकती बाबत वाद विवाद सुरु असल्याने लवकरच सदर मिळकती बाबत मा. दिवाणी न्यायालय, शिरुर कासार, येथे सरस निरस मानाने वाटप करुन स्वतंत्र ताबा मिळणे बाबत दावा दाखल करणार असुन सदर दाव्यामध्ये खालील प्रमाणे मिळकती सामाविष्ट केलेल्या आहेत.

मौजे निमगाव (मायंबा), ता. शिरुर कासार, जि. बीड, येथील मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | स. नं./ ग. नं. | एकुण क्षेत्र हे. | एकुण क्षेत्र आर. | पो.ख. आर. | आकार रु. | आकार पै. | वादीचा हिस्सा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | ७९० | ०० | ३६ | ०२ | ०० | ९३ | १/७ |
| २) | ७९१ | ०२ | १७ | ०३ | ०२ | २० | १/७ |
| ३) | ७९४ | ०१ | ९७ | ०० | ०२ | ०० | १/७ |

सदरील मिळकतींचे कोणीही खरेदी–विक्री, तारण, बक्षिसपत्र, कर्ज बोजा, गहाणखत, दाणपत्र, आदी अन्य कोणत्याही प्रकारे व्यवहार करण्याच्या तयारीत आहेत. वास्तवीक सदरील खरेदी विक्री आदी कोणत्याही प्रकारचे व्यवहार करणे बेकायदेशीर असुन त्यामुळे आमचे पक्षकाराच्या कोणत्याही हक्काला बाधा निर्माण होत नाही. परंतु सदर खरेदीखतामुळे आमजनतेची व कोर्टाची दिशाभुल होणार आहे. त्यामुळे सदर खरेदी– विक्री व्यवहारामुळे जमीन खरेदी घेणाऱ्या व्यक्तीच्या होणाऱ्या आर्थीक नुकसानीला व मानसिक त्रासाला आमचे पक्षकार हे कसल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत. तसेच सदर खरेदी व्यवहाराने होणारे नुकसानाची व कायदेशीर परिणामाची सर्वस्वी जबाबदारी खरेदी विक्री / हस्तांतरण करणाऱ्या संबंधीत व्यक्तींवर राहील. याची दखल घेण्यात यावी.

करीता हे जाहीर प्रगटन प्रकाशित करण्यात येते.

दिनांक : /१०/२०२५
ठिकाण : शिरुर कासार,
मार्फत :ॲड. एच. एस. कोठुळे.
दिवाणी व फौजदारी न्यायालय, शिरुर कासार,

**प्रगटन देणार**
**शहादेव पि. साहेबराव बाबर**

## संत नामदेव घुमान यात्रेचे हिंगोलीत स्वागत:१८० भाविकांचा सहभाग



हिंगोली । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील भाविकांना अध्यात्म, पर्यटन, इतिहास आणि संस्कृतीचा अद्वितीय अनुभव देणारी नानक साई फाऊंडेशनची नांदेड ते अमृतसर व्हाया नरसी नामदेव हि ११ वी ''घुमान यात्रा' सोमवारी ता. २७ पंजाब राज्याकडे रवाना झाली आहे. या यात्रेचे रोजी हिंगोली रेल्वे स्थानकावर जोरदार स्वागत करण्यात आले असून रेल्वे स्थानकावर संत नामदेव, संत तुकाराम महाराजांचा गजर घुमला आहे. संत नामदेव महाराजांनी भागवत धर्माची पताका थेट पंजाबपर्यंत नेली. त्यांच्या कार्याची स्मृती चिरंतन ठेवण्यासाठी नानकसाई फाऊंडेशन नांदेड यांच्यावतीने जेष्ठ पत्रकार पंढरीनाथ बोकारे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी नांदेड ते घुमानयात्रा काढली जाते. यावर्षी या यात्रेचे आकरावे वर्ष आहे. सुमारे दहा दिवसांची घुमानयात्रा भाविकांसाठी अविस्मरणीय अनुभव असतो. आजवर या यात्रेत सुमारे ४ हजार जण सहभागी झालेले आहेत.

नांदेडच्या नानक साई फाऊंडेशनचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार पंढरीनाथ बोकारे यांच्या नेतृत्वाखाली यात्रा सोमवारी काढण्यात आली. ''नामदेव तुकाराम'' असा गजर करत ही यात्रा नांदेड येथून हिंगोली मार्गे पंजाब कडे मार्गस्थ झाली. नांदेड श्रीगंगानगर या रेल्वेने यात्रा निघाली असून यामध्ये १८० भाविक सहभागी झाले आहेत. या यात्रेचे हिंगोली रेल्वेस्थानकावर आगमन होताच उपस्थित भाविकांनी जल्लोष केला. यावेळी यात्रेत सहभागी भाविकांनाही शुभेच्छा दिल्या. यात्रेवर पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी सेवानिवृत शिक्षणाधिकारी शिवाजीराव पवार, कवी शिवाजी कऱ्हाळे, डॉ. विठ्ठल रोडगे, विठ्ठल वाबळे, चंद्रकांत कावरखे, गोविंदराव गुरुजी कऱ्हाळे, गणेश साहू, प्रवीण शिंदे, प्रा माणिक रोडगे, गोरे हे उपस्थित होते. सदर यात्रेचा ११ दिवसांचा प्रवास असून पंजाब, हरियाणा, हिमाचल, दिल्लीतील धार्मिक इतिहासिक स्थळांचे दर्शन करून यात्रा ६ नोव्हेंबर रोजी नांदेड येथे परतणार आहे. पंजाब राज्यातील घुमान येथे मोठा धार्मिक कार्यक्रम घेतला जाणार असल्याचे पत्रकार बोखारे यांनी सांगितले.

# नागरिकच पकडू लागले पाकीट चोर, बीडचे पोलीस मात्र त्यावर शिरजोर

## बीड बस स्थानकात पाकीटमारांचा सुळसुळाट

बीड । प्रतिनिधी

दीपावलीच्या सुट्ट्या आणि दीपावली नंतर पुन्हा परगावी जाणाऱ्या प्रवाशांची बस स्थानकामध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी असते या गर्दीचा फायदा पाकीटमार घेत आहेत शिवाजीनगर पोलीस मात्र केवळ बघ्याची भूमिका घेत असून गेल्या आठ दिवसात पाकीट मारीच्या चार घटना घडल्या तर दोन घटनांमध्ये नागरिकांनीच पाकीट चोर पकडले एवढ्या घटना घडूनही पोलीस मात्र दिवाळी वसुलीतच मग्न असल्याचे दिसत आहे

सध्या बाजारपेठ आणि बस स्थानकामध्ये प्रवासी त्याचबरोबर बाजारपेठेत खरेदीसाठी मोठी गर्दी होत असल्याने या गर्दीचा फायदा पाकीट मार भुरटे चोर करताना दिसत आहेत मात्र या दीपावलीच्या दहा दिवसांमध्ये एकही कारवाई पोलिसांनी केलेली दिसून येत नाही बीडच्या बस स्थानकामध्ये नियमित पाकीट मारायचा व्यवसाय सुरू आहे बस स्थानक परिसरात चोरट्यांचा सुळसुळाट हा प्रवासासाठी त्रासदायक होत आहे विशेषता शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये बस स्थानक परिसर घेत असल्याने शिवाजीनगर पोलीस प्रमुख आणि कर्मचारी मात्र याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसत आहे प्रत्येक दिवशी दोन कर्मचारी या ठिकाणी नियुक्त केले जातात कोणत्याही चोराची ओळख होऊ नये हाच त्यामागचा उद्देश असावा मात्र कोणीही कर्मचारी पाकीट मारावर कारवाई करताना दिसत नाही नागरिकांनाच स्वतःची काळजी घ्यावी लागते गेल्या पंधरा दिवसांमध्ये १२ ते १३ घटना बस स्थानकामध्ये घडले आहेत या सर्व घटनेमध्ये तेथील काही नागरिकांनी पाकीटमार पकडले पोलिसांच्या स्वाधीने केले मात्र कारवाई झाली नसल्याचे बोलले जात आहे पोलीस पकडतात आणि सोडून देतात अशीच भावना प्रवाशांची झाली आहे मागील आठ दिवसापूर्वी भाजी मंडई कापड व्यापार असलेल्या सुवास रोड मोंढा या भागांमध्ये चोरीच्या अनेक घटना घडल्या बीड शहर पोलीस ठाणे बीड ग्रामीण पोलीस ठाणे शिवाजीनगर पोलीस ठाणे या हद्दीमध्ये तर खिसे कापू आणि चोरट्यांची चांगलीच चांदी झाल्याचे बोलले जात आहे बस स्थानकामध्ये नियमित पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक ठेवण्याची ही मागणी होत आहे अनेक वेळा घटना घडल्यानंतर चित्रपटातील भूमिकेप्रमाणे पोलीस एन्ट्री करतात तोपर्यंत चोर पळून गेलेला असतो आता या प्रकाराकडे खुद्द पोलीस अधीक्षकांनीच लक्ष देण्याची गरज आहे किंवा त्यांनी शिवाजीनगर ठाणे प्रमुख बीड शहर ठाणे प्रमुख यांना तंबी द्यावी अशी देखील मागणी होत आहे







### बीड बस स्थानकात पोलीसच नसतात

सध्या दीपावलीच्या सुट्ट्या संपल्यामुळे येणारे आणि जाणाऱ्या प्रवाशांची मोठी गर्दी बस स्थानकावर असते याच गर्दीचा फायदा घेत अनेक पाकीटमार सक्रिय झाले विशेषता पोलिसांचा वचक नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात पाकीट मारे आणि चोरी होत आहे शिवाजीनगर पोलीस ठाण्याकडून रोज दोन नवीन कर्मचारी नियुक्त केले जातात मात्र हे कर्मचारी दिवसभर कुठे असतात हे दिसत नसल्याचे अनेक प्रवाशांचे म्हणणे आहे

# अंबाजोगाईत धार्मिक कार्यक्रमात युवकाचा विजेच्या धक्क्याने मृत्यू

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दिव्य ज्योती जागृती संस्थेच्या वतीने शहरात सुरू असलेल्या सात दिवसीय भागवत कथा ज्ञानयज्ञात दुर्दैवी घटना घडली आहे. रविवारी रात्री प्रवचनादरम्यान विजेचा धक्का बसून प्रशांत सुधाकर सोनवणे (वय २३) या युवकाचा मृत्यू झाला.



मिळालेल्या माहितीनुसार, दिव्य ज्योती परिवार लातूर संस्थेच्या संवर्धन प्रकल्पांतर्गत अंबाजोगाईतील योगेश्वरी महाविद्यालयाच्या प्रांगणात २५ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान भागवत महापुराण कथा आयोजित करण्यात आली आहे. या कथेत आशुतोष महाराज यांच्या शिष्या साध्वी अदिती भारती प्रवचन देत आहेत. रविवारी दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमादरम्यान आरती सुरू असताना प्रशांत सोनवणे याला थ्री-फेज विद्युतपुरवठ्याचा जोरदार धक्का बसला. तो काही अंतरावर फेकला गेला. उपस्थितांनी तत्काळ त्याला स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. मयत प्रशांत याचे आई-वडील दोघेही स्वाराती रुग्णालयात कार्यरत आहेत. अतिशय धार्मिक असणारे हे संपूर्ण सोनवणे कुटुंब या भागवत कथा सप्ताहाच्या कार्यक्रमात सेवा बजावत होते. याच दरम्यान झालेल्या दुर्घटनेमुळे शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

# विजेचा शॉक लागून तरुणाचा मृत्यू

आष्टी । प्रतिनिधी

घरासमोरील पाण्याची टाकी धुत असताना विजेचा धक्का बसून वामनभाऊनगर येथील शैलेश जरांगे या ३३ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवारी घडली. शैलेश पांडुरंग जरांगे हा सामाजिक व धार्मिक कार्यात अग्रेसर असे. आष्टी शहरातील संत वामनभाऊनगर, जरांगे वस्ती येथील रहिवासी असलेले शैलेश पांडुरंग जरांगे हा रविवारी सकाळी पाण्याची टाकी धुण्यासाठी गेले होते.टाकीतील पाण्यात अचानक विद्युत करंट उतरल्याने त्यांना विजेचा जोरदार धक्का बसला.

कुटुंबीयांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी तातडीने वीजपुरवठा बंद केला मात्र तोपर्यंत शैलेश हे हौदात कोसळला होता. कुटुंबीय आणि शेजाऱ्यांनी त्यांना तातडीने हौदातून बाहेर काढून आष्टी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.मात्र, डॉक्टरांनी त्यांना उपचारांपूर्वीच मृत घोषित केले.त्यानंतर ग्रामीण रुग्णालयात त्यांच्या शवविच्छेदन करण्यात आले. पार्थिवाचे आष्टी शहरातील जरांगे वस्ती येथे राहत्या घराजवळ असलेल्या शेतात त्यांच्यावर रविवारी दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. शैलेश जरांगे यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,एक मुलगी, भाऊ,आई आणि वडील असा परिवार आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिस उपनिरीक्षक नरवडे व सद्दीप गिराम यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

# डॉ.संपदा मुंडे मृत्यू प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करावी -डॉ.दत्ता तपसे

**युसूफवडगांव । प्रतिनिधी**

सातारा जिल्ह्यातील फलटण येथील जिल्हा उपरूग्णालयात कार्यरत असलेल्या महिला वैद्यकीय अधिकारी डॉ.संपदा मुंडे यांनी पोलीस निरीक्षकांच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली होती आता प्रकरणात राजकीय हस्तक्षेप वाढल्याने तपास योग्य दिशेने होणार नाही म्हणुन या प्रकरणाचा तपास हा करावी अशी मागणी डॉक्टर संघटनेचे राज्यध्यक्ष डॉ.दत्ता तपसे यांनी केली आहे.

फलटण उपजिल्हा रुग्णालय येथील महिला वैद्यकीय अधिकाऱ्याच्या आत्महत्येचा तपास हा मार्फत करावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य राजपत्रित वैद्यकीय अधिकारी संघटनेचे लीगल सेलचे राज्याध्यक्ष डॉ.दत्ता तपसे यांनी केली आहे कारण या प्रकरणामध्ये राजकीय हस्तक्षेप खुप मोठ्या प्रमाणात घडलेला आहे.डॉ तपसे यांनी स्वतः फलटण उपजिल्हा रुग्णालयात जाऊन चौकशी केली आहे.सध्या स्थानिक पोलीस स्टेशन मार्फत तपास सुरु आहे त्यामुळे तपास योग्य होणार नाही,राजकीय हस्तक्षेप असल्यामुळे पुरावे नष्ट केले जातील अशी संघटनेला शंका आहे म्हणून या प्रकरणाचा पूर्ण तपास हा मार्फत होणे गरजेचे आहे.या प्रकरणामध्ये जे जे सहआरोपी आहेत त्यांना कठोर शिक्षा व्हावी अशी सर्व जनतेची व महाराष्ट्र राज्य राजपत्रित वैद्यकीय अधिकारी संघटनेची मागणी आहे.

# जालिंदर साळुंके यांना पत्नी शोक

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील नागपूर खुर्द येथील माजी सरपंच जालिंदर साळुंके यांच्या पत्नी संजीवनी जालिंदर साळुंके यांचे दिर्घ आजाराने दि. २७ ऑक्टोबर सोमवार रोजी दुपारी १ वा. निधन झाले. त्यांच्यावर सायंकाळी पाच वाजता अत्यंत शोकाकुल वातावरणात नागापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



नागापूर येथील माजी सरपंच जालिंदर साळुंके यांच्या पत्नी व संजीवनी या गेल्या काही दिवसांपासून कॅन्सरच्या आजाराने त्रस्त होत्या. मध्यंतरी त्यांचे प्रकृती सुधारली होती मात्र गेल्या एक महिन्यापासून त्यांची प्रकट जी पुन्हा गंभीर बनली त्यांच्यावर बीड संभाजीनगर या ठिकाणी उपचार करण्यात आले मात्र या उपचाराला यश आले नाही शेवटी सोमवारी दुपारी एक वाजता त्यांचे दुःखद निधन झाले त्यांच्यावर नागापूर खुर्द येथील स्मशानभूमीत अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी पंचक्रोशीतील आप्तेष्ट नातेवाईक मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.यांच्या पश्चात पती जालिंदर साळुंके, मुले सतिष साळुंके व नितीन साळुंके, मुलगी यशोदा,सुना, नातवंडे, दीर, भाऊजाई असा मोठा परिवार आहे.

# राष्ट्रवादीकडून पालिका निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी मागणी अर्ज दाखल करावेत-ॲड.चव्हाण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अंबाजोगाई नगरपरिषदेची निवडणुक राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात तर प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, राज्याचे माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच बीड जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण व प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी, माजी उपनगराध्यक्ष बबनराव लोमटे यांच्या देखरेखीखाली अंबाजोगाई शहराचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी मोठ्या ताकदीने लढविणार आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून नगरपालिका निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या इच्छुकांनी उमेदवारी मागणी अर्ज दाखल करावेत असे आवाहन जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, शहराध्यक्ष महादेव आदमाने व उपाध्यक्ष रशिदभाई सय्यद यांनी केले आहे.



अंबाजोगाई शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अंबाजोगाई शहरच्या प्रमुख पदाधिकारी आणि नगरपालिकेची निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या नगराध्यक्षपद आणि नगरसेवक पदासाठी इच्छुकांनी आपले उमेदवारी मागणी अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह मंगळवार, दिनांक २८ ऑक्टोबर आणि बुधवार, दिनांक २९ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत या वेळेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अंबाजोगाई संपर्क कार्यालय, रिलायन्स पेट्रोल पंप परिसर, अंबाजोगाई (जि.बीड.) येथे दाखल करावेत. या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अंबाजोगाई शहर महासचिव प्रा.शैलैष जाधव (मोबाईल – ९०७५५५४७७७) हे दिलेल्या वेळेत उपस्थित राहून सदरचे अर्ज स्विकारतील. यावेळी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना शहराध्यक्ष महादेव आदमाने व उपाध्यक्ष रशिदभाई सय्यद हे म्हणाले की, अंबाजोगाई शहरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे सर्वच प्रभागात अतिशय ताकदीचे सक्षम उमेदवार उपलब्ध आहेत. कारण, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मानणारा आठरापगड जाती धर्मातील वर्ग अंबाजोगाई शहर व परिसरात मोठ्या प्रमाणावर आहे. तसेच मागील काळात राष्ट्रवादी काँग्रेस व अंबाजोगाई नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या माध्यमातून अंबाजोगाई शहरात मोठ्या प्रमाणावर विकास कामे पूर्ण झाली आहेत. त्याच धर्तीवर आगामी काळात देखील संपूर्ण अंबाजोगाई शहर हे राष्ट्रवादीमय करून शहराचा सर्वांगीण विकास करून अंबानगरीच्या सौंदर्यात भर टाकण्यासाठी, प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी, शहरातील विविध प्रभागातील जनतेला पुन्हा मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राजकिशोर मोदी व बबनराव लोमटे यांच्या माध्यमातून त्यांचे सर्वच प्रभागातील सहकारी सज्ज झाले आहेत. अंबाजोगाई शहरात राष्ट्रवादी काँग्रेसकडे विविध क्षेत्रातील निष्ठावान कार्यकर्त्यांची अतिशय मजबुत व खंबीर अशी फळी उपलब्ध आहे. माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी विविध माध्यमांतून सातत्यपूर्ण केलेली सेवा जनता अद्याप विसरलेली नाही. मोदी हे सर्व जनतेला सहज उपलब्ध होणारे जनसेवक आहेत. अंबाजोगाई शहरात शांतता, सौहार्द, एकोपा, सुरक्षितता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशिवाय पर्याय नाही. असे जनतेचे मत बनले आहे. त्यामुळेच मागील काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसकडे सर्वस्तरांतील जनतेचा ओघ वाढला आहे. व त्यामुळेच की, काय माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांना अंबाजोगाई शहरात सर्वत्र उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.

# आ.धस यांच्या दिवाळी स्नेहमिलन कार्यक्रमात पाटोदा तालुका पत्रकार संघाची उपस्थिती

पाटोदा । प्रतिनिधी

आष्टी येथील 'अद्वैतचंद्र'निवासस्थानी आमदारसुरेशआण्णाधस यांच्या वतीने आयोजित दिवाळी स्नेहमिलन कार्यक्रमात पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्वीय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदातालुकापत्रकारसंघ सदस्यांनी उत्स्फूर्त उपस्थिती लावली या वेळी आमदार सुरेश आण्णा धस तसेच युवा नेते सागर आप्पा धस यांनी सर्व पत्रकार बांधवांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे, सचिव तथा आमदार सुरेश आण्णा धस यांचे पाटोदा तालुका प्रसिद्धीप्रमुख मीडिया चिफ ॲड.महेश बेदरे, यांच्या सह पत्रकार शेख महेशर, बळीराम जायभाय,विजय जाधव,चंद्रकांत पवार,भाऊसाहेब पवार,अविराज पवार,सय्यद रियाज,राहुल सोनवणे,सखाराम भोसले, दत्ता वाघमारे, सतीश गर्जे, बबन उखांडे, समाधान शहागडकर सह आदी पत्रकारांनी उत्स्फूर्त हजेरी लावली. या प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुकाध्यक्ष डॉ.नरेंद्र जावळे तसेच युवा उद्योजक विशाल आरसूळ पाटील यांची देखील उपस्थिती होती. आमदार सुरेश आण्णा धस यांनी सर्व उपस्थित पत्रकार बांधवांशी आपुलकीने संवाद साधून त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.



# कॉपर वायर चोर मुद्देमालासह गजाआड

### स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक यांनी जिल्ह्यातील चोरी, घरफोडी, जबरी चोरी व दरोडा इत्यादी मालमत्तेचे विरूध्द गुन्हे उघड करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिलेले आहेत. त्यानुसार गुन्हा अनुसं शाखेने परळी आणि धर्मापुरी येथे कॉपर वायर चोरी करणाऱ्या गुन्हेगारांना मुद्देमालासह ताब्यात घेतले.

दि.१७.१०.२०२५ रोजी फिर्यादी नामे लक्ष्मण बापुराव चाटे रा.खापरटोन ता. अंबाजोगाई जि.बीड यांनी पोस्टे परळी ग्रामीण येथे फिर्याद दिली की, ते वॉचमन म्हणुन कामास असलेल्या धर्मापुरी येथील सोहेल ऑईल मिलमध्ये डिट्युवर असतांना दि. १७.१०.२०२५ रोजी रात्री ०१.०० वा ते पहाटे ०४.०० वाचे दरम्यान अनोळखी चोरट्याने त्याचे हात, पाय बांधुन, चाकु व लाकडी काठ्या दाखवुन, धमकी देवुन, मिल मधील लाईटच्या डिपीतील तांब्याची तार, आईल व स्टील प्लेट असा मुद्देमाल बळजबरीने चोरून नेल्याची तक्रार दिली होती. त्यावरून पोस्टे परळी ग्रामिण येथे गुरन. ४३९/२०२५ कलम ३०९(४),३२४(२)३५१(२) भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

वरील दाखल गुन्ह्यातील अनोळखी गुन्हेगाराचा स्थानिक गुन्हे शाखा बीड येथील पोनि शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली, पोउपनि सुशांत सुतळे, पोह १४२९ रामचंद्रकेकान, ९८९ विष्णु सानप, १९१८ गोविंद भताने, पोअ १०५५ सचिन आंधळे असे शोध घेत असतांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, या गुन्ह्यातील तांब्याची तार १) बाळु उर्फ संतोष सोपान कांबळे रा. मिलीदनगर परळी वैजनाथ जि. बीड २) नजमोद्दीन बशीर शेख रा. बरकत नगर परळी वैजनाथ जि.बीड यांनी व त्यांच्या साथीदाराने चोरून त्यांच्या राहत्या घराच्या पाठीमागे लपवुन ठेवली आहे. मिळालेली माहिती पोनि पान ३ वर

# गुंडगिरी करणाऱ्याविरुद्ध कठोर कारवाई करणार -पो.अधीक्षक बंसल

जालना । प्रतिनिधी

जालना शहरासही जिल्ह्यामध्ये कायदा सुव्यवस्था सुरळीत राहण्यासाठी गुंडगिरी करणाऱ्या विरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी दिला आहे. याप्रकरणी जालन्याचे खासदार कल्याण काळे येणे एक शिष्ट मंडळ सोबत घेऊन आज पोलीस अधीक्षक यांची भेट घेतली यावेळी ते म्हणाले की जालना शहरात गुंडगिरीचे प्रमाण वाढले असून यासंदर्भात तत्काळ उपयोजना करावे अशी सूचना पोलीस अधीक्षक यांना केली आहे. त्या अनुषंगाने गोपनीय पोलीस पथक गुंडगिरी करणाऱ्या लोकांची माहिती घेणार आहे. आणि या संदर्भात लवकरच कारवाई करण्यात येईल असे पोलीस प्रशासनाच्या वतीने कळविण्यात येत आहे.

यावेळी मा.खा.डॉ.कल्याण काळे, आ.अर्जुनराव खोतकर, राजेश टोपे, मा. आ. संतोष सांबरे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष श्री राजाभाऊ देशमुख, उद्धव ठाकरे गटाचे श्री भास्करराव आंबेकर,श्री बबलूसेठ चौधरी, श्री अतिक खान, श्री रशिद पहिलवान, विनीत सहानी, श्री संजयसेठ मुथा, व इतर व्यापारी, नागरीकांनी पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. सदर निवेदनात जालना शहर व जिल्ह्यातील नागरिकांच्या वाढत्या असुरक्षिततेबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. मागील काही दिवसांपासून शहरात तसेच ग्रामीण भागात गुंडगिरी, चोरी, धमकावणे, व विनाकारण मारामाऱ्या अशा अनेक घटना घडत आहेत. या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलीस प्रशासनाने लवकरात लवकर कारवाई करावी.



रात्रौ उशिराच्या वेळेस रस्त्यावर बेकायदेशीरपणे फिरणारे संशयास्पद युवक, दुकानदारांना, व्यापारी वर्गाला,उद्योजकांना धमक्या देणे,खंडणी मागणे व त्यांच्यावर जीवघेणे हल्ला करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे.तसेच काही भागात लुटमारीच्या घटना घडल्याची माहिती नागरिकांकडून वारंवार मिळत आहे. जालना शहरात खुनाची घटना नियमितपणे घडत आहे. सदरील घटनांसाठी सर्रासपणे जीवघेणे शस्त्र व बंदुकींचा वापर केला जात आहे अशी शस्त्रे कुणाकडून व कशी उपलब्ध होतात या बाबत गांभीर्याने कार्यवाही करण्याची गरज आहे. अशा घटना थांबविण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलिस प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलणे अत्यावश्यक आहे. जालना येथील नवीन मोंढा परिसरात व्यापारी,शेतकऱ्यांचा सतत राबता असतो व या ठिकाणी शेतमालाच्या पैशांचा व्यवहार मोठ्या प्रमाणात चालतो त्यामुळे येथे गुंड प्रवृत्तीचे लोक व्यापारी व शेतकऱ्यांना धमकावून वेळप्रसंगी जीवघेणा हल्ला करून लुटमार करतात यासाठी येथे एक पोलीस चौकी उभारण्याची मागणी व्यापाऱ्याकडून करण्यात येत आहे. जालना शहर व जिल्ह्यात पोलिस गस्त व नाकाबंदी वाढवावी. गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावे. शहरातील सर्व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची कार्यक्षमता तपासून नियमितपणे निरीक्षण करावे.

पोलिस पेट्रोलिंग वाहनांची संख्या वाढवून रात्रीच्या वेळी संवेदनशील भागात तैनाती करावी. नागरिकांसाठी ''हेल्पलाइन'' सक्रिय ठेवून तक्रारींवर तत्काळ कारवाई करण्यात यावी. जालना शहराच्या शांततेसाठी व नागरिकांच्या सुरक्षेसाठी वरील उपाययोजना तात्काळ राबविण्यात याव्यात अशा मागण्या करण्यात आल्या यावेळी पोलीस अधिक्षक अजय कुमार बंसल यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन सर्व प्रकारच्या गुन्हेगारीला आळा घालण्याचे आश्वासन दिले. आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुरंदर विमानतळ भूसंपादनाची मोजणी पूर्ण

## अहवाल राज्य सरकारकडे पाठवणार - जिल्हाधिकारी

पुणे । प्रतिनिधी

पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनासाठी सात गावांमधील जमिनीची किरकोळ गट वगळता संपूर्ण मोजणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. आता भूमिअधिग्रहणाबाबतचा अहवाल राज्य सरकारला पाठविण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले. या अहवालाला मंजुरी मिळाल्यानंतर भूसंपादनाचा मोबदला देण्याबाबतचा अहवाल तयार करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

पुरंदर विमानतळासाठी कुंभारवळण, वनपुरी, खानवडी, उदाचीवाडी, मुंजवडी, एखतपूर आणि पारगाव अशा सात गावांधून १ हजार २८५ हेक्टर जमीन संपादित करण्यात येणार आहे. त्यासाठी २६ सप्टेंबरपासून सात गावांमधून मोजणीची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मोजणीसाठी जिल्हा प्रशासनाने पाच पथके तयार केली होती. त्या पथकामार्फत ही





मोजणी पूर्ण करण्यात आली. त्याकरिता भूसंपादन अधिकारी समन्वयक डॉ. कल्याण पांढरे, उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे तसेच भूसंपादन अधिकारी डॉ. संगीता चौगुले-राजापूरकर या तीन अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात ही मोजणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. पारगाव वगळता उर्वरित गावांमध्ये मोजणीची प्रक्रिया शांततेत पूर्ण झाली. मात्र, पारगाव गावात काही शेतकऱ्यांनी मोजणी करण्यास विरोध दर्शविला. त्यामुळे त्या शेतकऱ्यांच्या जमिनीचा गट वगळता जिल्हा प्रशासनाने संपूर्ण मोजणी गेल्या शनिवारी पूर्ण केली.

काही किरकोळ शेतकऱ्यांकडून विरोध होत असला, तरी हा विरोध तात्कालिक असून, त्यांच्याकडून संमती घेण्यात येणार आहे. तत्पूर्वी, विरोधाच्या पार्श्वभूमीवर, जिल्हा प्रशासनाने ड्रोन सर्व्हेद्वारे संपूर्ण सातही गावांतील १ हजार २८५ हेक्टरची मोजणी दोन दिवसांपूर्वीच पूर्ण केली होती. त्यामुळे शेतकऱ्यांचा विरोध असला तरी मोजणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात जिल्हा प्रशासनाला यश आले आहे. येत्या काही दिवसांत त्या शेतकऱ्यांचे मन वळविण्याचे आणि संमती घेण्याचे कामही जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.सात गावांतील ३ हजार २०० शेतकऱ्यांनी २८१० एकर जागेसाठी संमती दिली आहे. आता शेतकऱ्यांशी चर्चा करून जागेच्या मोबदल्याचे स्वरूप निश्चित करण्याचे काम लवकरच हाती घेण्यात येणार असल्याचे जिल्हा प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

# कामगार नेतृत्वाने उद्दिष्टांपासून भरकटू नये: प्राचार्य अनिरुद्ध देशपांडे यांचे प्रतिपादन

पुणे । प्रतिनिधी

कामगार नेत्याने आपल्या उद्दिष्टांपासून कधीही भरकटू नये, तसेच देशहित हेच उद्दिष्ट ठेवत उद्योग, कामगार आणि सर्वांचे हित जपतच कामगार संघटना चालवावी लागते, असे स्पष्ट प्रतिपादन प्राचार्य अनिरुद्ध देशपांडे यांनी केले. कै. श्रीपाद देशपांडे यांच्या पंचविसाव्या स्मृतिदिनी मोतीबागेतील केशव सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.




कै. श्रीपाद देशपांडे यांनी याच विचारांचा वस्तुपाठ घालून दिला आहे, असे सांगून प्राचार्य देशपांडे पुढे म्हणाले की, श्रीपाद देशपांडे यांचे व्यक्तिमत्त्व भारतीय मजदूर संघाच्या तत्त्वज्ञानाशी पूर्णपणे एकरूप झाले होते. त्यांनी समर्पित वृत्तीने, स्वतःच्या व्यक्तिगत अडचणी आणि कुटुंबाकडे दुर्लक्ष करून बँक कर्मचारी वर्गासाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले.

कै. श्रीपाद देशपांडे हे बँक ऑफ महाराष्ट्र कर्मचारी संघाचे अध्यक्ष होते. त्यांनी कर्मचारी वर्गाला केवळ पगार, भत्ता या संकुचित विचारसरणीतून बाहेर काढून सकारात्मक विचारसरणीकडे आणले. त्यांच्या प्रयत्नांमुळे मोजक्या सभासद संख्येत असलेली संघटना प्रचंड मोठी झाली, असे गौरवोद्गार प्राचार्य देशपांडे यांनी काढले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. रविरामन यांनी यावेळी बोलताना श्रीपादराव देशपांडे यांना 'परीसासारखे' असल्याचे सांगितले. त्यांच्या स्पर्शामुळे शेकडो कर्मचारी समर्पित कार्यकर्ते बनले, असे त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी पूर्वाश्रमीच्या युनायटेड वेस्टर्न बँक, बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ इंडिया यातील अधिकारी, कार्यकर्ते तसेच बँक ऑफ महाराष्ट्रातील एक्झिक्युटिव्ह आणि अधिकारी उपस्थित होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे श्री. श्रीधरपंत फडके, श्री. मुकुंदराव गोरे, बँक ऑफ महाराष्ट्र अधिकारी संघटनेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब फडणवीस, मुकुंदराव भालेराव, श्याम भुरके इ. मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी कुलकर्णी यांनी केले.

# 'ड्रग माफिया'च्या मृत्यूला धक्कादायक वळण! शरीरावर जखमा, पण मृत्यूचे कारण अस्पष्ट ; ससूनच्या अहवालाने गूढ वाढवले

**पुणे । प्रतिनिधी**

**मीरा- भायंदरचा कुख्यात ड्रग माफिया मोहम्मद अजिम अबू सालेम खान (५०) याच्या कोंढव्यातील पोलीस कारवाईदरम्यान झालेल्या मृत्यू प्रकरणाला नवं आणि धक्कादायक वळण लागले आहे. ससून रुग्णालयाच्या फॉरेन्सिक अहवालात त्याच्या डोक्यावर आणि शरीरावर अनेक ठिकाणी जखमा असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, मृत्यूचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट राहिले आहे.या पार्श्वभूमीवर सीआयडीने ससून रुग्णालयालाच पत्र लिहून मृत्यूचे स्पष्ट कारण सांगण्याची मागणी केली आहे.**



बी. जे. मेडिकल कॉलेज आणि ससून जनरल हॉस्पिटल येथील फॉरेन्सिक मेडिसिन विभागाने दिलेल्या अहवालानुसार, शारीरिक जखमांबरोबरच मृतदेहाच्या रक्तवाहिन्यांत कोरोनरी आथेरोस्क्लेरोसिस म्हणजे रक्ताच्या गुठळ्या तयार होण्याचा आजार असल्याचे आढळले. तरीदेखील हे नैसर्गिक कारण आहे की बाह्य आघातामुळे मृत्यू झाला, याविषयी अहवालात संदिग्धता आहे.

सर्व दस्तऐवज, पोस्टमॉर्टेम अहवाल आणि कारवाईत सहभागी अधिकाऱ्यांची निवेदने घेतली आहेत. आता चौकशीचा केंद्रबिंदू म्हणजे अजिम सालेमचा मृत्यू पोलिसांनी ताब्यात घेताना झटापटीत झाला आहे, की आधीपासून असलेल्या आजारामुळे झाला, याचा शोध सुरू आहे.कोंढव्यातील एका सोसायटीमध्ये १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास मीरा-भायंदर पोलीस आणि कोंढवा पोलिसांनी संयुक्त कारवाई केली. अजिम सालेम कौसर बाग येथील भाड्याच्या फ्लॅटमध्ये लपला होता. पोलिसांनी दरवाजा तोडून आत प्रवेश केला तेव्हा सालेमने अचानक प्रतिकार केला आणि एका कॉन्स्टेबलच्या छातीला चावला. या वेळी पोलिसांबरोबर झालेल्या झटापटीत काही क्षणांतच तो कोसळला आणि बेशुद्ध पडला. ससून रुग्णालयात दाखल केल्यावर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

सुरुवातीला कोंढवा पोलिसांनी हा मृत्यू अपघाती म्हणून नोंदवला होता; पण अहवालातील जखमा पाहता प्रकरण सीआयडीकडे सोपवण्यात आले. आता पोलिसांच्या ताब्यातील मृत्यू या स्वरूपातही तपासाची दिशा वळू शकते. ससूनच्या अहवालात व्हिसेरा आणि डीएनए नमुने तपासासाठी जतन करण्यात आले आहेत. त्यामुळे रिजनल फॉरेन्सिक लॅबचा अहवाल आल्यानंतरच या गूढ मृत्यूमागील सत्य उघड होण्याची शक्यता आहे.

# शिरूर-हवेलीत बोगस मतदारांचा सुळसुळाट! माजी आमदार अशोक पवार यांचा गंभीर आरोप

शिरूर । प्रतिनिधी

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिरूर-हवेली मतदारसंघातील वेगवेगळ्या गावात मतदारयादीमध्ये हजारो बोगस नावांची नोंदणी झालेली आहे. या प्रकरणाची विशेष तपास पथक नेमून सविस्तर चौकशी करावी, तसेच संबंधित अधिकारी, कर्मचारी व मतदारमाफीयाविरुद्ध गंभीर गुन्हे दाखल करावेत. याबाबत येत्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून कडक भूमिका घेणार असल्याचे प्रतिपादन माजी आमदार ड. अशोक पवार यांनी शिक्रापूर येथे झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्ता मेळाव्यात केले. (डरींशीीं झींपश छ्शुी)

या वेळी ड. पवार म्हणाले, मतदार यादीची सविस्तर माहिती मिळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे २० पेक्षा अधिकवेळा पत्रव्यवहार केलेला आहे. त्यापैकी एकाच पत्राचे उत्तर आले. शिरूर-हवेली मतदारसंघात मतदारमाफीयांनी प्रत्येक प्रभागात आपापले नातेवाईक, हितचिंतक आणि कार्यकर्त्यांची नावे नोंदवली आहेत. मतदारसंघाच्या बाहेरील नावांची मोठी संख्या आहे. काही प्रभागांमध्ये बनावट मतदार आहेत.निवडणूक जिंकण्यासाठी हे षडयंत्र सुरू आहे. ठरावीक एजन्सीला रकमेचे पॅकेज देऊन हजारो नागरिकांची बोगस नावे मतदार यादीत नोंद केली आहेत. या विषयाचे अनेक पुरावे आम्ही गोळा केले आहेत. विधानसभेच्या निवडणुकीला पराभवाचे आत्मपरीक्षण केले तर पराभवाचे उत्तर



सापडत नाही. निवडणूक शाखेतील काही अधिकारी, बीएलओ व कर्मचारी यांच्या संगनमताशिवाय हे शक्य नाही. यामुळे बोगस मतदान आणि बोगस नोंदणी करताना आढळल्यास तत्काळ अटक करून कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी या वेळी केली.

बोगस मतदार नोंदणी करणार्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आश्वासन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिले आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी मतदार यादी अभ्यास करून सील करावी. यावर कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी बारीक लक्ष ठेवावे. पक्षाचे बीएलए नेमावेत, असे आवाहन माजी आमदार अशोक पवार यांनी मेळाव्यातील उपस्थित कार्यकर्त्यांना केले. या वेळी खा. अमोल कोल्हे, पक्षाचे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम, घोडगंगा कारखान्याचे उपाध्यक्ष पोपट भुजबळ, तालुकाध्यक्ष विश्वास ढमढेरे, संजय जगताप, डॉ. पवन सोनवणे, राहुल करपे, मुझफ्फर कुरेशी, पूजा भुजबळ यांची भाषणे झाली. दत्तात्रेय हरगुडे, पंडित दरेकर, संभाजी भुजबळ, बाबा सासवडे ,सोमनाथ भुजबळ आदी मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सूत्रसंचालन संपत ढमढेरे यांनी केले तर आभार तालुका अध्यक्षा विद्या भुजबळ यांनी मानले.

# टँकरला चुकवताना बोलेरोचा भीषण अपघात ; सात वर्षीय मुलाचा जागीच मृत्यू

नीरा । प्रतिनिधी

पुरंदर आणि बारामती तालुक्याच्या सीमेवरून जाणाऱ्या नीरा-मोरगाव मार्गावर नीरा नजीक चौधरवाडी गावच्या हद्दीत रविवारी (दि.२६) दुपारी बोलेरो जीपचा भीषण अपघात झाला. दुर्घटनेत सात वर्षीय मुलाचा जागीच मृत्यू झाला असून, एकजण गंभीर जखमी झाले आहेत. मुलीला सासरी सोडून नातवासह घरी परतताना टँकरला चुकवताना वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला.स्वराज्य अजित मेमाणे (वय ७), असे मृत्यू झालेल्या नातवाचे नाव आहे.




राधुनाथ बबन मेमाणे (वय ५०) हे गंभीर जखमी झाले आहेत. आजोबा आणि नातू हे दौंड तालुक्यातील खोपोडी येथील राहिवासी आहेत. दिवाळीनंतर आपल्या मुलीला सासरी सोडण्यासाठी राधुनाथ मेमाणे गडदरवाडी येथे आले होते. परतीच्या प्रवासात बोलेरो जीपला समोरून आलेल्या टँकरला चुकवताना वाहनावरील नियंत्रण सुटले आणि बोलेरो रस्त्याच्या कडेला जाऊन दगडाला धडकली. यामध्ये ७ वर्षाच्या स्वरजला गंभीर दुखापत झाली.

अपघात इतका भीषण होता की, लहान स्वराजचा जागीच मृत्यू झाला, तर राधुनाथ मेमाणे गंभीर जखमी झाले. अपघातानंतर नीरा पोलीस चौकीचे कर्मचारी संदिप मदने, कोळेकर यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमींना नीरा येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# मोहोळ-धंगेकर वादावर अखेर एकनाथ शिंदेंचा पडदा, दोघांनाही दिला संयमाचा सल्ला

आळंदी । प्रतिनिधी

महायुतीमध्ये दंगा करायचा नाही आणि विरोधकांच्या हातात काही कोलीत मिळेल असं करू नका, असा सल्ला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला.पुण्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि शिवसेना शिंदे गटाचे नेते रवींद्र धंगेकर यांच्यातील वादावर अखेर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. शिंदे यांनी आळंदी येथे पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले, मी त्यांना सांगितलं आहे की महायुतीत दंगा होऊ नये.

रवींद्र धंगेकर यांना महायुतीत काम करणारा व अन्यायाविरोधात लढणारा कार्यकर्ता असल्याचे सांगत शिंदेंनी पाठदेखील थोपटली. धंगेकर यांनी यापूर्वीही स्पष्ट केले आहे की, भाजप



विरोधात आपली भूमिका नाही. आता जे काही प्रकरण सुरू आहे त्यावरही पडदा पडेल. या प्रसंगी धंगेकर स्वतः शिंदे यांच्या सोबत उपस्थित होते आणि हेलिपॅडवर शिंदे यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

उद्योगमंत्री उदय सामंत यांनीही मोहोळ-धंगेकर वादावर प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, मुरलीधर मोहोळ यांना काही गैरसमज झाला आहे. दोन्ही बाजूंनी महायुतीत मिठाचा खडा पडेल असे वागू नये. प्रत्येकाने संयम ठेवावा. रवींद्र धंगेकर बोलत असताना योग्य आहे असे मी कधीच म्हटलं नाही.

# मतदार यादीवर लक्ष ठेवण्याचे अमोल कोल्हेंचे कार्यकर्त्यांना आवाहन

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

**सध्या होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबतचा निर्णय वरिष्ठ पातळीवर होणार असला तरी, कार्यकर्त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी आताच कामाला लागावे, असे आवाहन शिरूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले आहे.शिक्रापूर येथे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित कार्यकर्ता संवाद मेळाव्यात मार्गदर्शन करताना खासदार डॉ. अमोल कोल्हे बोलत होते.**



याप्रसंगी माजी आमदार अशोक पवार, जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम, तालुकाध्यक्ष विश्वास ढमढेरे, महिला तालुकाध्यक्षा विद्या भुजबळ, घोडगंगाचे उपाध्यक्ष पोपट भुजबळ यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. अडचणीच्या काळात पक्षाच्या मागे उभ्या असलेल्या कार्यकर्त्यांचा पक्ष निश्चित विचार करणार असल्याचे खासदार कोल्हे यांनी सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस डॉक्टर सेलचे डॉ. पवन सोनवणे यांनी अनेक ठिकाणी बोगस मतदान लावले जात असल्याने प्रत्येक बूथ निहाय बूथ कमिटी नेमण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. तसेच, जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांनी इच्छुक उमेदवारांना मतदार यादीवर लक्ष देण्याचे आवाहन केले.

बोगस मतदारांचा मुद्दा संसदेत मांडा..

सध्या पुणे जिल्ह्यात अनेक ठिकाणी बोगस मतदार उभे केल्याचे चित्र असून, काही ठिकाणी एकाच घरात १८० मतदार असल्याचे समोर आले आहे. आपण याबाबत संसदेत आवाज उठवावा आणि शिरूर-हवेलीत जिल्हा परिषद गटानुसार वेळ द्यावा, अशी मागणी माजी आमदार अशोक पवार यांनी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्याकडे केली.

# ती संस्थात्मक हत्याच, उच्च न्यायालयाने समिती गठित करावी; सुषमा अंधारेंची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

**फलटणमध्ये झालेल्या महिला डॉक्टरची आत्महत्या नसून ती संस्थात्मक हत्या आहे. माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांच्या दबावामुळेच हा प्रकार घडला आहे. निंबाळकर यांच्यासह संबंधित पोलिस अधिकाऱ्यांची चौकशी करावी. त्यासाठी उच्च न्यायालयाने समिती गठित करावी, अशी मागणीही शिवसेनेच्या (उद्धव बाळासाहेब ठाकरे) उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केली.**

या पत्रकार परिषदेला शिवसेनेचे शहरप्रमुख गजानन थरकुडे, संपर्कप्रमुख अनंत घरत यांच्यासह निंबाळकर यांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणारे फलटणमधील एका कुटुंबातील महिला उपस्थित होत्या. या महिलांनीही निंबाळकर यांच्यावर आरोप केले. अंधारे म्हणाल्या की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे निंबाळकर यांना क्लीन चिट कसे देतात? निंबाळकर यांच्यासह महिला डॉक्टरला त्रास देणाऱ्या आणि दबाव



टाकणाऱ्या पोलिस अधिकारी, स्वीय सहाय्यकांची चौकशी झाली पाहिजे. बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगार निंबाळकर त्यांच्या साखर कारखान्यासाठी आणत होते. कामगार कारखाना सोडून जाऊ नये, यासाठी त्यांना मारहाणही करण्यात आली असल्याचे अंधारे यांनी या वेळी सांगितले.

फलटण पोलिस ठाण्यातील अधिकाऱ्यांच्या मदतीने कामगारांवर खोटे गुन्हे दाखल केले जात होते. सरकारी दवाखान्यात त्यांना दाखल करून कामगार शारीरिक तंदुरुस्ती (फिजिकली फिट) दाखविले जात होते. हे करण्यासाठी या महिला डॉक्टरवर दबाव टाकला जात होता. यासंदर्भात संबंधित महिला डॉक्टरने वरिष्ठांना पत्र दिले होते. आत्महत्येवेळी तिने हातावर लिहिलेल्या मजकुरातील हस्ताक्षर तिचे नसल्याचा दावा डॉक्टरच्या कुटुंबाने केला आहे. फलटणमध्ये घर असतानाही ही महिला घटनेपूर्वी निंबाळकर यांच्या निकटवर्तीयाच्या हॉटेलवर गेली होती. ती का गेली, याची चौकशी झाली पाहिजे. हा सर्व प्रकार संशयास्पद आहे. त्यामुळे इतर कोणत्या तपास यंत्रणांमार्फत चौकशी न करता न्यायालयाने समिती स्थापन करावी, अशी मागणीही अंधारे यांनी या वेळी केली.

# एफटीआयआय प्रवेश प्रक्रियेत गोंधळ! आरक्षण धोरणाचे उल्लंघन; अपारदर्शकतेविरोधात विद्यार्थ्यांचा संताप

पुणे । प्रतिनिधी

फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिटच्यूट ऑफ इंडियाच्या प्रवेश प्रक्रियेतील गोंधळ एफटीआयआय विद्यार्थी संघटनेने उघडकीस आणला. विद्यार्थ्यांनी प्रशासनाच्या निष्काळजीपणावर आणि अपारदर्शक कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करत एफटीआयआय २०२४-२५ च्या प्रवेश प्रक्रियेत झालेल्या त्रुटींविरोधात तीव्र भूमिका घेत विद्यार्थ्यांनी प्रशासनाकडे तात्काळ स्पष्टीकरणाची मागणी केली आहे.

एफटीआयआयने १७ ऑक्टोबर २०२५ रोजी जाहीर केलेल्या अंतिम गुणवत्ता यादीत आरक्षण धोरणाचे उल्लंघन झाल्याचे विद्यार्थ्यांच्या निदर्शनास




आल्यानंतर प्रशासनाने लिपिकीय त्रुटी मान्य करत २४ ऑक्टोबर रोजी सुधारित यादी प्रसिद्ध केली. मात्र, सुधारित यादीत नव्या समस्या समोर आल्या आहेत. स्क्रीन ॲक्टिंग अभ्यासक्रमातील जागा १६ वरून २३ करण्यात आल्या असून यात आरक्षणाचे प्रमाण बिघडले आहे. अनुसूचित जाती आणि जमातींसाठी राखीव जागा कमी झाल्या तर सामान्य आणि ओबीसी गटाच्या जागा वाढल्या, असा आरोप विद्यार्थी संघटनेने केला आहे.

विद्यार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, एफटीआयआयने प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता न राखता स्टेज-१ आणि स्टेज-२ मधील गुण, श्रेणी व आरक्षण वर्गवारी जाहीर केली नाही. तसेच, 'सीट प्रेफरन्स' पर्याय नंतर देण्याऐवजी सुरुवातीला सक्तीने मागवण्यात आल्याने अनेक विद्यार्थ्यांना अन्याय सहन करावा लागला आहे. या वादामुळे देशातील अग्रगण्य चित्रपट संस्थेच्या कार्यप्रणालीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विद्यार्थ्यांनी प्रशासनाकडे केलेल्या मागण्या

- तात्काळ प्रवेश प्रक्रिया स्थगित करणे. - दोन्ही टप्प्यांचे निकाल व गुण जाहीर करणे. - संपूर्ण प्रक्रियेवर बाह्य चौकशी समिती नेमावी. - आरक्षण धोरणानुसार पारदर्शक आणि न्याय प्रवेश प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी विद्यार्थी प्रतिनिधींना प्रशासकीय मंडळात स्थान द्यावे.